
4

स्थापना १९१६



साईबाबांच्या
मूर्ती पूजेचीं भांडीं
व
चांदीचे
सोन्याचे
मोत्यांचे
सर्व प्रकारचें दागिने तयार करणारी मुंबईतील विश्वासू सुप्रसिद्ध पेढी

ई. आर. मालपेकर

जितेकर चाळ, ठाकुरद्वार, मुंबई नं. २



# श्री साई वाक्सुधा

"ज्यांना मीच सर्वस्व वाटतें व ज्यांना माझी आत्यंतिक आवड वाटते, त्यांच्या दृष्टिसमोर मी सदैव असतों. माझ्याविणें त्यांना सारें जग ओसाड वाटतें. सदा-सर्वकाळ त्यांच्या तोंडी माझ्याच गोष्टी असतात. ते माझें ध्यान सदैव करीत असतात. त्यांच्या जिभेवर माझें नांव अखंड खेळत असतें. ते कुठेंही जावोत किंवा येवोत, माझ्या गोष्टींशिवाय त्यांना दुसरें कांहीं आठवत नाहीं. अशा रीतीनें तद्रूप झाल्यामुळें त्यांना काय करावें व काय करूं नये, हें अचूक समजत जाईल. जेथें माझ्या सेवेची व माझ्या नांवाची आवड आहे, तेथें त्याच्याजवळ मी सदा-सर्वकाळ तिष्ठत असतों. जे मला अनन्यभावें शरण येतात व ज्यांना माझें स्मरण अखंड होत असतें, त्यांचें माझ्या डोक्यावर ऋण झालेलें असतें. त्याचा उद्धार करून त्या ऋणाची मी फेड करीत असतों."

— श्रीसाईसच्चरित


## श्री गुरुपौर्णिमा अंक.

[ शिरडी संस्थानचें अधिकृत मासिक ]

वर्ष ३८ वें ] जुलै १९६० [ अंक ४ था

: संपादक :

नागेश आत्माराम सावंत

वार्षिक वर्गणी रु. ५ ( ट. ख. सह )

टे. नं. २५१२७४

: कार्यालय :

ईस्ट ॲण्ड वेस्ट इं. कं. बिल्डिंग, ४९।५५ अपोलो स्ट्रीट, फोर्ट, मुं. १

# प्रिय वाचक—

शिरडी येथें दरवर्षी पुण्यतिथ्योत्सव व श्रीरामनवमी उत्सव, श्रीसाईबाबांच्या प्रेरणेनें मोठ्या समारोहानें व भक्तिभावपूर्वक साजरे केले जातात, त्याचप्रमाणें त्या खालोखाल महत्त्व श्रीगुरुपौर्णिमेनिमित्त होणाऱ्या उत्सवाला आहे आणि तो उत्सव-प्रसंग पुढील आठवड्यांत येत असून त्यानिमित्त श्रीसाईलीलेच्या या अंकांत गुरु-महात्म्यासंबंधीं अनेक लेख देण्यांत आले आहेत.

गुरुमहात्म्य आम्हीं काय सांगणार? गुरु म्हणजे प्रति परमेश्वर. त्याचा महिमा ज्यांना त्याची ओळख पटली त्यांनींच गावा. 'हे तो अनुभवाचे बोल!' आणि आजवर अनुभवी साधुसंतांनीं गुरुमाऊलीचें महात्म्य परोपरीनें गायिलें आहे. तेंच त्यांच्या शब्दांत सांगण्याचा, अल्प प्रमाणांत कां होईना, आमच्या वाचकांसाठीं गुरुमहिमा कथन करण्याचा, हा लहानसा प्रयत्न आहे; आमचे वाचक तो गोड मानून घेतील अशी आशा आहे.

× × ×

श्रीसाईबाबा हे गुरु महाराजांचें महत्व जाणून होते. गुरुमाऊलीवर त्यांची असीम निष्ठा होती असें दिसून येतें. आणि म्हणूनच तर त्यांच्या प्ररणेनेंच शिरडींत प्रतीवर्षी गुरु पौर्णिमा उत्सव मोठ्या समारोहानें साजरा केला जात असतो; परंतु श्रीसाई भक्तांनीं नेहमीं लक्षांत बाळगण्याजोगी एक महत्वाची गोष्ट म्हणजे त्यांनी आपले शिष्य असे कोणी केले नाहींत व कोणाच्या कानांत गुरुमंत्रहि सांगितला नाहीं.

गुरूचा महिमा व गुरूचा गौरव किती आहे हें जाणत असूनहि तें बहुमानाचें लेणें लौकिकदृष्ट्या ते जरी ल्याले नाहींत तरी त्यांचे सारें जीवन गुरुमय बनलेलें होतें. नांवांत काय आहे? सारें कांहीं आहे तें कृतींत. त्यांच्या साऱ्या जीवनांतील साऱ्या घटना गुरुकृपेनें भारलेल्या होत्या. श्रीसाईबाबा, गुरु, शिष्य व त्यांचें जीवनकार्य हीं सारी नातीं त्यांच्या जीवनांत एकमेकाशीं इतकीं निगडित झालेलीं होतीं कीं, त्यांची एकमेकांपासून फारकत करतां येण्याजोगी नव्हती.

'जगाच्या कल्याणा। संतांच्या विभूति।' अशा कोटींतील ते होते. त्यांनीं गुरुशिष्य सांप्रदायाचा व्याप केला नाहीं; परंतु सर्वांनीं सुखांत, समाधानांत व आनंदांत नांदावें यासाठीं ते परोपरीनें झटले. श्रीसाईबाबा म्हणजे माणुसकीचा पूर्णावतार. मानवांचें दुःख, दैन्य दूर करावें, मानवांतील दानव नाहींसा करावा, मानव चिंतामुक्त व रोगमुक्त व्हावा, यासाठीं ते परोपरीनें झटले व त्यांनीं अभिवचन देऊन ठेवल्याप्रमाणें आजही त्यांच्यामागें तें कार्य तितक्याच किंबहुना अधिकाधिक जोमानें अखंड चालू आहे.

× × ×

श्रीसाईबाबांच्या कार्याचा यशोध्वज त्यांच्या हयातींत ज्या ऐश्वर्यानें व वैभवानें फडकत होता, त्याच वैभवानें व दिमाखानें तो त्यांच्यामागें आजही डौलानें फडकत आहे. शिरडी म्हणजे साईभक्तांची पुण्यपावन गंगोत्री. ठायीं ठायीं कितीही साईधामें निर्माण झालीं तरी त्या गंगोत्रीचें महत्व व महात्म्य कधींही तिळभर कमी होणार नाहीं. उलट तें उत्तरोत्तर वाढतच जावयाचें आहे व तसें तें वाढत चाललें आहे.

हें स्थानमहात्म्य, त्याची असंख्य भक्तांच्या मनाला लागून राहिलेली अखंड ओढ व साईबाबांच्याठायीं वाढत चाललेली जनतेची भक्ति ध्यानीं आणून तिच्यापासून येनकेन प्रकारेण फायदा करून घेण्याचे प्रयत्न मधून मधून चालू असतात. 'साई दरबार,' 'द्वारकामाई' यासारखी जनतेचीं मनें आकृष्ट करणारी व भोळ्या मनाला भुरळ पाडणारी शब्दयोजना करून स्वार्थासाठीं जो आभास निर्माण केला जात असतो, त्यापासून जनतेनें नेहमीं सावध राहिलें पाहिजे.

कोणी काय वाटेल तें करो; कोणत्या गोष्टींचें आचरण करण्यांत साईबाबांची भक्ति केल्याचें पुण्य पदरीं पडतें याचा विचारी भक्तांनीं स्वतःशीं विचार व त्याप्रमाणें आचार केला पाहिजे. ज्या प्रयत्नांच्या पायाशीं स्वार्थ पुजला गेला आहे, तो प्रयत्न कधींहि सफल होणार नाहीं, आजवर सफल झालेला नाहीं.

साईबाबा ही आपले मनोरथ पूर्ण करणारी विभूति आहे. त्यांना मनोभावें जो शरण गेला, त्याला त्या शरणागतीचें सुंदर फळ चाखायला मिळाल्याशिवाय रहाणार नाहीं. परंतु त्यासाठीं वाटाड्याची मात्र जरूरी नाहीं. येथें प्रत्येकानें मनोमन साक्ष पटवून घ्यायची आहे. जें कांहीं करायचें तें मनाला ग्वाही ठेऊन करावयाचें. येथें मध्यस्थाची किंवा वाटाड्याची जरूरी नाहीं.

साईलीलेंतून हें वेळोवेळीं आम्हांला परोपरीनें सांगावें लागत आहे; कारण आजकाल जिकडे पहावें तिकडे भोळ्या भाविकांस फसविण्याचे प्रयत्न फार चाललेले आहेत. स्वतःचा स्वार्थ साधण्यासाठीं कल्पक लोक नाना प्रकारच्या युक्त्या लढवीत आहेत व बहुसंख्य भक्तांच्या मनाला भुरळ पाडणाऱ्या साईबाबांच्या नांवाचा संबंध जोडून देत आहेत. अशावेळीं भक्तांना सावधगिरीची सूचना देणें, हें आमचें कर्तव्य आहे.

× × ×

शिरडी येथें श्रीसाईबाबांच्या दर्शनासाठीं व नवस फेडण्यासाठीं येणाऱ्या भक्तांसाठीं शक्य त्या सुखसोयी शिरडी संस्थान समिति झटून यथाशक्ति करीत आहे. अजूनही किती तरी सुखसोयी व सुधारणा करण्यास वाव आहे व त्या शक्य तेवढ्या लौकर अंमलांत याव्या, या दृष्टीनें संस्थान समीति पावलें टाकीत आहे. श्रीसाईबाबांच्या व जनता जनार्दनाच्या कृपेनें या पुढील काळांत शिरडीला आदर्श स्वरूप लौकरच प्राप्त होईल अशी आपण अपेक्षा करूं या.

— संपादक




## हा बाबांचा कृपाप्रसाद

**श्री.** चंद्रसेनराव रामराव मोहिते, मु. राजेवाडी, पो. भोर, जि. उत्तर सातारा; हे लिहितात कीं,

'मी आज दहा वर्षांपासून शिर्डीस श्री बाबांच्या दर्शनासाठीं सर्व घरांतील मंडळीसह येत असतों व आम्हां सर्वांचा श्री बाबांवर पूर्ण भरंवसा आहे. मी स्वतः श्री बाबांच्या तीनहि उत्सवांस दरवर्षी येत असतों.

ता. ३ मार्च १९६० ची गोष्ट. मी तापानें आजारी पडलों. शिर्डीस येऊं लागल्यापासून मी स्वतः पुष्कळदां आजारी पडलों. व त्याला उपाय म्हणजे श्री बाबांची उदी पाण्यांत घालून पिणें व अंगाला लावणें असा माझा नियम आहे. मी श्री बाबांची पूजा रोज दोन वेळां नित्य नियमानें करतों. ता. ३ मार्चला मी जो आजारी पडलों तों माझें दुखणें फारच वाढत गेलें. तें इतकें वाढलें कीं, तापामुळें मधून मधून मी सेमी–अनकॉशस होतों. या आजारांत पाण्यामध्यें उदी टाकून ज्याप्रमाणें मी हमेशा आजारी पडल्यावर घेत होतों, त्याप्रमाणें ती घेण्याचें मला भान राहिलें नाहीं व घरच्या मंडळींनाहि आठवण झाली नाहीं. फक्त ते मला उदी लावीत होते.

दरम्यान माझी तब्यत फारच बिघडली व जवळ जवळ १३ मार्चला वडिलांनीं भोरचे डॉक्टर कॅप्टन बाबरे यांस आणलें. तशांतहि मी इंजेक्शन वगैरे घेण्याचें नाकारलें. एवढ्यावरहि घरची मंडळी सौ. आई व वडील हे थांबले नाहींत. लगेच दुसऱ्या दिवशीं वडील पुण्यास गेले व पुण्याचे प्रख्यात डॉक्टर श्री. व्ही. एस्. प्रयाग यांस आणलें. ज्यावेळेस डॉक्टर प्रयाग राजेवाडीस आले. त्यावेळीं मी सेमी–अनकॉशस होतों. नाइलाजास्तव घरच्या मंडळींनीं एवढी खटपट केली म्हणून मी त्यांचें औषध घेतलें. कारण आज माझ्या वडिलांचें वय ८४ वर्षांचें व सौ. आईचें ७६ वर्षांचें आहे म्हणून त्यांना दुखावितां आलें नाहीं. ज्या दिवशीं डॉ. प्रयाग आले, त्याच्या आदल्या दिवशीं मी माझ्या कुटुंबास सांगितलें कीं, 'ज्याप्रमाणें मी आजारी पडल्यावर श्री बाबांची उदी पाण्यांत टाकून घेतों, त्याप्रमाणें ती मला द्या' व त्याप्रमाणें ती घेतल्यावर माझ्या आजारास उतार पडून ताप १८ मार्चला उतरला. हा ताप टायफॉईडचा होता, त्यामुळें २७ मार्चपर्यंत दुसऱ्याच्या मदतीशिवाय कोणत्याहि प्रकारची हालचाल करतां येत

नव्हती. ता. २७ मार्चला रात्रीं मी सर्व मंडळींना सांगितलें कीं, माझा ताप उतरला असून मला फक्त अशक्तपणा आहे. तेव्हां मी ता. १ किंवा २ एप्रिलला कोणीतरी बरोबर घेवून श्री बाबांच्या रामनवमीच्या उत्सवास जाणार. ता. २८ मार्चला गुढी–पाडव्याच्या दिवशीं श्री. आबासाहेब देशमुख, दर्यापूरकर, आमचे मेव्हणे यांची एक्सप्रेस तार आली कीं माझ्या भगिनी सौ. कुसुमावतीबाई अतिशय सीरियस आहेत. तार मला १ वाजतां मिळाली व जरी माझी परिस्थिति जाण्यासारखी नव्हती तरी मी श्री बाबांची प्रार्थना करून माझा भाचा चि. अशोक देशमुख व माझ्या सौभाग्यवती असे तिघे दुपारीं ३॥ वाजतां राजेवाडीहून दर्यापुरास जाण्यास निघालों.

आम्ही ३० मार्चला पहांटे दर्यापुरास पोहोचलो. तेथें जाऊन पाहतो तों माझ्या बहिणीचें ब्लड–प्रेशर २२०/१२० असें होतें व नाकांतून रक्त वहात होतें. याप्रमाणें त्यांची तब्येत होती. माझी बहीण श्री बाबांना मानते व अनेकदां ती शिर्डीस श्री. बाबांच्या दर्शनास गेली आहे.

या सर्व दरम्यान माझ्यापुढें एकच विचार उभा रहात होता कीं यावेळीं मला रामनवमीच्या उत्सवास शिर्डीस जातां येत नाहीं. परंतु श्री बाबांची इच्छा असल्यावर काय होणार नाहीं ? ता. ३ एप्रिलला दर्यापूरचे दोन्ही डॉक्टरांनीं मला सांगितलें कीं, " तुमच्या बहिणीस कोणत्याही प्रकारचा धोका नाहीं व तुम्ही शिर्डीस रामनवमीसाठीं जाऊं शकतां. " त्याप्रमाणें मी दर्यापुराहून रामनवमीस शिर्डीस गेलों.

माझी बहीण जरी श्री. बाबांना मानते तरी तिनें श्री बाबांचें चरित्र डिसेंबर १९५९ पर्यंत कधींच वाचलें नव्हते, परंतु हें पुढचें आजाराचें टाळण्यास कीं काय तिनें मला श्री साईचरित्र पाठवून देण्यास कळविलें. त्याप्रमाणें मी जानेवारी १९६० मध्यें तिला श्री साईचरित्र पाठवून दिलें. तेव्हांपासून आजारी पडेपर्यंत ती श्री साईचरित्र वाचीत होती. आतां तिची तब्येत पुष्कळ सुधारली आहे.

श्री साईमाउली भक्तांसाठीं कशी धावून येते व संकट कसें निवारण करते व भक्ताची दर्शनाची इच्छा कशी पार पाडते, याचा हा एक अनुभव आहे. कारण माझे स्वतःचें आजारपण व रामनवमीच्या सुमारास माझ्या बहिणीचें आजारपण अशा परिस्थितींत मला उत्सवास येण्याची अगदींच शक्यता वाटत नव्हती. पण श्री बाबांची इच्छा असल्यावर काय होणार नाहीं ?

### श्रीसाईबाबांचा प्रसाद

**श्री.** ज. ह. वीरकर मु. मनोहरवाडी, पो. मुलुंड ( पूर्व ), मुंबई नं. ४९ हे आपला अनुभव कळवितांना लिहितात कीं, १९५२ सालापासून वेळ काढतां काढतां, १९५४ सालीं मी प्रथम शिर्डीस गेलों. तेथील पवित्र वातावरण व भक्तांचा भाव पाहून मन बरेंच भारावून गेलें. गुरुवारचे सर्व कार्यक्रम पाहून मनाला

प्रसन्नता वाटली. दुसऱ्या दिवशीं बाबांच्या समाधीसमोर परंतु गॅलरींत बसून मनोभावें बाबांची प्रार्थना करीत होतों 'बाबा ! दोन वर्षांच्या प्रयत्नांनंतर आज आपल्या पायांची धूळ माझ्या मस्तकीं लागली. निदान वर्षांतून एकदांतरी असा योग यावा हीच मोठी इच्छा.' भावनांच्या आवेगानें मन कंठ अगदीं दाटून आलें. कठड्यास टेकून, डोळे मिटून घेतले. श्री साईचरणांचे ठसे अंतकरणांत उमटवून घेत होतो तोंच एक लहानसा गारगोटीचा दगड माझ्या उजव्या मांडीवर पडला. जरा दचकलों ! कोणी मुलानें बाहेरून मारलेला दगड सहज येऊन पडला असेल. त्यांत काय चौकशी करायची ! असा विचार येऊन टाकून देण्यासाठीं तो उचलला. हात फिरवितांच त्याचा तळभाग दिसला मात्र ! अन् नेत्र ठिपकूं लागले. तळाच्या भागावर अतिसुंदर, उजव्या पावलाचा ठसा स्पष्ट दिसला. लगेच मस्तक वांकलें, त्या पावलाचें चुंबन घेतलें. मनांत म्हटलें 'या पामराला बाबांनीं प्रसाद दिला.' तेव्हांपासून तें 'पाऊल' देवांच्या समवेत पुजिलें जातें.

---

## श्री गुरु पौर्णिमा उत्सव

श्रीसच्चिदानंद सद्गुरु साईबाबा संस्थान शिर्डी, जि. अहमदनगर, यांच्या सालाबादप्रमाणें श्री गुरु पौर्णिमा उत्सव आषाढ शु॥ १३ शके १८८२ गुरुवार (दिनांक ७–७–१९६०) पासून तीन दिवस श्रीक्षेत्र शिर्डी येथें होणार आहे. व तो शनिवार (दिनांक ९–७–७०) रोजीं समाप्त होईल.

दि. ७–७–६० ला सकाळीं ६ वाजल्यापासून २४ तास श्रीसाईनाम संकीर्तन व श्रीसाई चरित्र परायण हे कार्यक्रम होतील.

## वर्गणीदारांस सूचना

श्रीसाईलीलेच्या अंक न मिळाल्याबद्दल मधून मधून वर्गणीदारांच्या तक्रारी येत असतात. श्रीसाईलीलेचे अंक दर महिन्याच्या ३० तारखेस वक्तशीरपणें पोस्टांत पडत असतात. तरी ४ तारखेपर्यंत अंकाची वाट पाहून नंतर पोस्टांत चौकशी करण्यांत यावी. इतकेंहि करून अंक न मिळाल्यास श्रीसाईलीला कचेरीस कळविण्यांत यावें. वर्गणीदारांकडे अंक वक्तशीरपणें जावे, याबाबतींत जास्तींत जास्त दक्षता बाळगली जात असते. कांहीं ठराविक वर्गणीदारांकडून अंक न मिळाल्याबद्दल वर्षांतून ५।६ वेळां तरी तक्रारी येतात. तरी अशा वर्गणीदारांनीं वरील सूचनेकडे कृपा करून जरूर लक्ष पुरवावें.

— व्यवस्थापक : श्रीसाईलीला

# व्यासमुनींचें महत् कार्य

नमोऽस्तु ते व्यास विशालबुद्धे
फुल्लारविंदायतपत्रनेत्र
येन त्वया भारत तैल पूर्णः
प्रज्वालितो ज्ञानमयः प्रदीपः

[ लेखक : आप्पाराव ]

महामुनी व्यास म्हणजे भारतीयांचेच नव्हे तर साऱ्या जगांतील लोकांचे परात्पर गुरु शोभतील एवढें प्रचंड उपकारक त्यांचें कार्य आहे. म्हणूनच गुरु पौर्णिमा अर्थात् व्यास पूर्णिमा साजरी करावयाची. हजारों वर्षांपूर्वी ते या भारतांत होऊन गेले; परंतु त्यांनीं भारताला महाभारताच्या रूपानें जो अमोलिक ठेवा देऊन ठेविला आहे, त्याच्या बळावर भारत आजही ताठ मान करून साऱ्या जगापुढें मानानें खडा आहे, ही पुण्याई व कर्तबगारी व्यासमुनींची !

भारतीय संस्कृतींत महामुनी वेद व्यासाचें महात्म्य फार मोठें आहे. आमच्या संस्कृतीचा ते सर्वाधार आहेत. कथानकांच्या, गोष्टींच्या व महाकाव्याच्या रूपानें एखादी संस्कृति टिकाऊ, सर्वगामी व लोकप्रिय कशी करतां येते हें त्यांनीं हजारों वर्षांपूर्वी दाखवून दिलें.

## व्यासांचें तिहेरी कार्य

त्यांनीं अत्यंत महत्वाचें असें तिहेरी कार्य यशस्वी रीतीनें पार पाडिलें आहे. ( १ ) आमचें वेदवाङ्मय हें सर्वत्र विखुरलेलें व अस्ताव्यस्त स्थितींत होतें. त्याला सुसंघटित व सुव्यवस्थित स्वरूप देण्याची संपादकीय कामगिरी वेदव्यासानीं पार पाडिली. ( २ ) वेदांत सूत्रांच्या आधारें त्यांनीं भारतीय तत्वज्ञानाला सुयोग्य स्वरूप दिलें. ( ३ ) महाभारतासारखें महान् व उपकारक महाकाव्य त्यांनीं जगाला दिलें.

आमच्या तत्वज्ञानांत एकवाक्यता व एकसूत्रीपणा कसा आहे हें त्यांनीं दाखवून दिलें. त्यांच्यामुळें भारताला अत्यंत प्राचीन पूर्वेतिहासाचा लाभ झाला. एका व्यक्तीनें हें केवढें मोठें प्रचंड कार्य करून ठेविलें आहे ! त्यांना माणूस कोण म्हणेल. ते देवांचे देव होते. महाभारत त्यांनीं श्रीगजाननाकरवीं लिहविलें.

आधुनिक काळांतील इतिहास संशोधकांनीं त्यांच्या काळाची साधारण कल्पना करून देण्याचा प्रयत्न केला आहे. साधारणपणें साडेतीन हजार वर्षांपूर्वी वेदव्यास

होऊन गेले असें त्यांचें म्हणणें आहे. महाभारतीय युद्धकाळ व त्यांचा काळ एकच. होमर कवीनें आपलें महाकाव्य लिहिलें त्यापूर्वी सुमारें पांच सहाशें वर्षें त्यांच्या काव्याची रचना पूर्ण झाली. ज्यू लोकांचा मोझेस किंवा इराणांत जन्माला आलेले झोरोआस्टर यांच्या जन्मापूर्वी कित्येक शतकें अगोदर ते या भारतांत होऊन गेले.

वेदवाङ्मयाचें संकलन करून त्यांनीं जी कामगिरी पार पाडिली, तिला तोड सांपडणें कठीण. त्यांना ' वेदव्यास ' हें नांव उगाच नाहीं मिळालें.

## महाभारताची मातब्बरी

आजकाल ' **महाभारत** ' या नांवानें ओळखल्या जाणाऱ्या त्या सर्वश्रेष्ठ ग्रंथाची मातब्बरी कोणत्या शब्दांनीं व्यक्त करावयाची ? आपल्या काळांतील विविध स्वरूपाच्या, विविध स्वभावाच्या व विविध चालचलणुकीच्या स्त्रीपुरुषांचीं त्यांनीं रंगविलेलीं चित्रें व त्यारूपानें त्यांनीं कथन केलेला इतिहास या देशाला अत्यंत उपकारक होऊन राहिला आहे.

माणसांनीं एकमेकाशीं कसें वागावें, कल्याणप्रद गोष्टी कोणत्या व अकल्याणास कारण होणाऱ्या गोष्टी कोणत्या, काय करावें व काय करूं नये, याचें शिक्षण व्यासप्रणित महाभारतानें आपणास होतें.

मानवी जीवनांत गुंतागुंतीचे, संभ्रमाचे व सुखदुःखाचे थोडे थोडके का प्रसंग येत असतात ! व्यास मुनींनीं दिव्य दृष्टीनें ते सर्व पाहिले व त्या त्यावेळीं कसें वागावें यासंबंधीं कोणत्याही काळांत उपयोगी ठरणारें ज्ञान त्यांनीं महाभारताच्या रूपानें जगाला दिलें. त्यांच्या दिव्य दृष्टीच्या टप्प्यांत आली नाहीं, अशी एकही गोष्ट नाहीं. आजकाल आपण जें सांगत आहोंत तें सारें व्यास मुनींचें उष्टें आहे ! किती थोर त्यांची योग्यता ! अशा महापुरुषाला जगाचा गुरु होण्याचा मान नाहीं द्यावयाचा तर तो दुसऱ्या कोणाला द्यायचा ?

व्यास मुनींनीं मानवी जीवनाचा, मानवी उत्कर्ष अपकर्षाचा साद्यंत इतिहास कथन केला आहे. सदाचार व दुराचार मनुष्याला कोणत्या स्थितीला पोहोंचवितो, सदाचाराचे सुपरिणाम कसे सुखदायक होतात व दुराचारी दुष्टांच्या वाट्यास शेवटीं कोणती स्थिति येते, याचें परिणामकारक चित्र हजारो वर्षांपूर्वी त्यांनीं रेखाटलें व त्यारूपानें त्यांनीं सांगितलेलीं महान् तत्त्वें सनातन होऊन राहिलीं आहेत. केवढी थोर त्यांची योग्यता !

व्यासांचे वडील पाराशर यांनीं पुराणांच्या रूपानें या महान् कार्याचा पाया घातला. त्या पायावर व्यास मुनींनीं अभंग व टोलेजंग इमारत उभारली. अशा रीतीनें व्यासमुनींनीं व त्यांच्या वडिलांनीं भारतीय संस्कृतीचें सुंदर मंदिर उभारलें.

## सर्वांत महत्त्वाची कामगिरी

परंतु वेदव्यासांची सर्वांत महत्वाची कामगिरी म्हणजे वेदसूत्रें एकत्र आणून त्यांचें सुंदर निरूपण करणें ही होय. त्या वेदांच्या आधारें त्यांनीं महाकाव्य, महाभारत रचिलें. मानवी मनाची मजल कुठवर जाऊं शकते, त्याच्या उडीचा पल्ला काय काय

गाठूं शकतो, त्याचें ध्येय काय, तें त्यानें कसें साध्य करावें, वगैरे सारें त्यांनीं सांगून ठाकिलें आहे. अनादिकालापासून भारतीयांचीं मनें व्यासमुनींच्या तत्वज्ञानानें संगोपिलीं व पोसलीं गेलीं आहेत. भारताला त्यांनीं सर्वोत्कृष्ट तत्वज्ञान, सुसंस्कृति व पूर्णत्वाला नेऊन पोहोंचविणारी परंपरा दिली.

व्यास मुनींचा जन्म अगदीं सर्वसाधारण कुळांत झाला. त्यांची माता होण्याचें भाग्य एका कोळणीला लाभलें हें लक्षांत घेण्यासारखें आहे. त्यांनीं सर्वसाधारण तसेंच उच्च समजल्या जाणाऱ्या वर्गांतही अलौकिक लोकप्रियता आपल्या कर्तबगारीनें संपादन केली.

आतां आपण थोडेसे इतर देशांकडे वळूं या. चीनमध्यें त्याच सुमारास जवळ जवळ तशाच प्रकारची घटना घडून आली. कथा पुराणांच्या रूपानें तिकडेहि मानवी जीवनाला मार्गदर्शक असें तत्वज्ञान सांगणारा महापुरुष जन्माला आला. पुढें त्याच तत्त्वज्ञानाला कालानुरूप योग्य असें वळण लागत गेलें.

ग्रीसमध्येंहि पुराणें व महाकाव्यें जन्माला आलीं. होमरनें इलियड हें काव्य त्याच धर्तीवर लिहिलें आहे. इतर देशांच्या इतिहासाकडे पहातां थोड्या फार फरकानें हाच प्रकार आढळून येतो. बाबिलोनमध्येंहि असेच महापुरुष निर्माण झाले.

व्यासमुनींचें श्रेष्ठत्व व महत्व जगांतील साऱ्या तत्वज्ञान्यांहून आगळें आहे. त्यांची दिव्यदृष्टि हजारो वर्षांच्या कालमर्यादेपर्यंत पोहोंचूं शकली. भारतांतील सर्व थरांमधील लोकांत ते मानवी जीवनाला पोषक व उपकारक अशा तत्वांचें बीजारोपण करूं शकले. कोणत्याहि काळीं व कोणत्याहि प्रसंगीं कसें वागावें व जीवन कसें शोभवावें हें ते सांगूं शकले ही त्यांची थोरवी. व्यासमुनींच्या पुण्यस्मृतीला आमचे शतशः प्रणाम !

---


दिव्य दृष्टीसाठीं

TELIGRAM : –DIVYANETRA

शिसा ऑप्टिशिअन्स (BOM.–DADAR)



( चष्म्यांचे व्यापारी )

यांच्या येथें डोळ्यांच्या तज्ज्ञ डॉक्टरांकडून डोळे मोफत तपासून उंची व टिकाऊ चष्मे माफक दरानें मिळतात.

**छबीलदास रोड, दादर ( W. R.), मुंबई २८.**

# गुरुकृपेची साऊली

—रमण महर्षि

ज्याला गुरूकृपेचा लाभ झाला, तो धन्य होय. मग गुरूच त्याची सारी कोडीं सोडवितो व त्याचा वाटाड्या बनून आणि त्याला ईश्वरी साक्षात्कार घडवून त्याच्या जन्माचें सार्थक करतो.

**शिष्य** :— गुरुकृपा म्हणजे काय? गुरुकृपेमुळें आत्मप्रचीतीचा मार्ग मोकळा होतो म्हणतात तो कसा?

**महर्षि रमण** :— आत्मा हाच गुरु...कधीं कधीं मनुष्य जीवनाला कंटाळून जातो. जें आहे त्यांत त्याला समाधान मानून रहातां येत नाहीं. त्याच्या इच्छा आकांक्षा अनेक असतात. त्या पूर्ण व्हाव्या म्हणून तो ईश्वराची प्रार्थना करूं लागतो! त्यामुळें आस्ते आस्ते त्याच्या मनाचें पावित्र्य वाढत जातें. देवाची भेट व्हावी असें वाटूं लागतें. संसारांतील इच्छा परिपूर्ण होण्यापेक्षां देवाची आपल्यावर कृपा व्हावी असें त्याला वाटूं लागतें. मग देव कृपेचे किरण त्याच्याकडे वळूं लागतात. एखाद्या गुरु महाराजाच्या रूपानें देव भक्ताला भेटतो. त्याला गुरुमंत्र देतो व त्याला आपल्या संगतीचा लाभ देऊन त्याचें मन निर्विकार व पवित्र बनविण्यास मदत करतो. भक्ताचें मन खंबीर बनतें. त्याच्या ठायीं असलेला दुबळेपणा नाहींसा होतो. मन अंतर्मुख होऊं लागतें. ध्यान धारणेंत गोडी वाटूं लागते व त्यामुळें अंतःकरणाचें पावित्र्य उत्तरोत्तर वाढत जातें. मनांत येणारे लाटांचे तरंग कमी कमी होत जातात. तेथें शांतता नांदूं लागते. ती निर्मळ शांतता, ती सर्व व्यापकता, तेंच आत्म्याचें सत्य स्वरूप.

गुरूचें कार्य बाहेरून तसेंच आंतूनही चालू असतें. बाहेरून मनाला अंतर्मुख होण्याबद्दल प्रेरणा चालू असते. आणि आंतूनहि मनानें आत्म्याकडे ओढ घ्यावी, व तेथें नीरव शांतता नांदावी, खळबळीला जागा राहूं नये, यासाठीं सारखे प्रयत्न चालू असतात. गुरुकृपेचें हें लक्षण आहे. ईश्वर, गुरु व आत्मा यांच्यांत भेदभाव कोणत्याही प्रकारचा नाहीं.

**शिष्य**:—थिऑसॉफीकल सोसायटींत मार्गदर्शनासाठीं महात्म्यांनीं (Masters) प्रसन्न व्हावें यासाठीं प्रार्थना करण्यांत येत असते.

**महर्षि**:—तो महात्मा, तो मार्गदर्शक तुमच्या अंतकरणांतच आहे. त्याचें वास्तव्य कुठें तरी बाहेर आहे हें जें अज्ञान तें घालविण्याचें कार्य ध्यानधारणेमुळें पार पडत असतें. तो-अंतरात्मा कोणी तरी परका आहे. आपल्यापासून वेगळा आहे

अशी तुमची भावना झाली असल्यास तो तुमच्यापासून दूर पळेल. तुम्हांला सांपडणार नाहीं. जोवर आत्मा व शरीर हीं एकमेकांपासून भिन्न आहेत, तुम्हीं म्हणजे तुमचें शरीर अशी जोंपर्यंत तुमची भावना असेल, तोंपर्यंत तो तुमच्यापासून दूर राहील. परंतु शरीर व आत्मा हीं दोन्हीं एकच आहेत ही चुकीची कल्पना ज्या दिवशीं नाहीशी होईल, त्यादिवशीं आत्मा व मार्गदर्शक महात्मा हे दोन्हीं एकच आहेत असें आढळून येईल.

**शिष्य** :—आत्मप्रचीतीच्या बाबतींत कांहीं मंत्रतंत्र सांगून गुरु आम्हांला मदत करूं शकेल काय ?

**महर्षि** :—गुरूनें तुम्हांला हाताशीं धरून तुमच्या कानांत कांहीं सांगितलें होतें कां ? तुम्हीं जसे आहांत तसेंच तुमचे गुरुजी आहेत. तुम्हांला तुमचा देह आहे तसाच तुमच्या गुरुचाही देह आहे. तेव्हां त्यांनीं आपल्यासाठीं दृश्य स्वरूपांत कांहींतरी करावें असें तुम्हांला वाटतें; परंतु त्यांचें कार्य तुमच्या दृष्टीस पडण्यासारखें नाहीं, त्यांचें कार्य आंतून चालतें. अध्यात्मिक जगांत ते वावरत असतात.

**शिष्य** :—गुरु कसा सांपडतो ?

**महर्षि** : —देव सर्व साक्षी व सर्व समजणारा आहे. भक्ताची प्रगति ज्या प्रमाणांत झाली असेल त्या प्रमाणांत तुम्हांला त्याच्या कृपेचा प्रसाद हा मिळावयाचाच. आपल्या निस्सीम भक्ताबद्दल भगवंताला दया वाटूं लागते व तो कोणाच्या ना कोणाच्या तरी रूपानें तुमच्या सहाय्यार्थ धावून येतो. भक्ताला वाटतें कीं, हा तर आपल्या सारखाच माणूस आहे; व तो दोन माणसांचे जसे परस्पर संबंध असतात, तसे त्यांच्याशीं जोडूं पहातो. परंतु गुरु जो प्रत्यक्ष भगवंतच असतो, तुमचा प्रति आत्मारामच असतो, तो आपलें कार्य आंतून सुरू करतो, त्याला त्याच्या चुकांची व दोषांची तोच जाणीव करून देतो. व त्याला आत्मप्रचीति होईपर्यंत त्याच्यावर सतत नजर ठेवतो.

**शिष्यः** —मग अशा परिस्थितींत भक्तानें काय करावयाचें ?

**महर्षिः** —त्यानें गुरुचा आदेश पाळावयाचा व अंतरगृहाकडे, अंतरंगाकडे लक्ष पुरवावयाचें. गुरूचें आंत तसेंच बाहेरही लक्ष असतें. तुम्ही अंतर्मुख व्हावें यासाठीं जरूर ती परिस्थिति तेच निर्माण करीत असतात. अंतर्भागांतील साफसुफीचें कार्य त्यांच्याच प्रेरणेनें होत असतें. बाहेरून तेच पुढें जाण्याची चालना देतात व आत्म्याच्या ठिकाणीं तुमचें लक्ष लागावें यासाठीं ते सतत झटत असतात. माझ्याच प्रयत्नांनीं मी जग जिंकीन व तें जिंकतां येईल असें तुम्हांला वाटत असतें; परंतु तुमचे मनोरथ जेव्हां ढासळतात तेव्हां तुम्ही आंत खेचले जातां व मग तुम्हांला जाणीव होऊं लागते कीं, मानवापेक्षां उच्चतम सामर्थ्यवान् अशी एक शक्ति या जगांत वावरत आहे.

अहंकार हा एखाद्या शक्तिशाली हत्तीसारखा आहे. त्याला आटोक्यांत आणण्यासाठीं त्याच्यापेक्षां शक्तिसंपन्न असा सिंहराजच हवा; आणि मानवाच्या बाबतींत तो सिंहराज म्हणजे सद्गुरु होय. त्याच्या केवळ दर्शनालाभानें अहंकाररूपी हत्तीचा थरकांप होतो.

तुमचें वैभव, तुमचें थोरपण कशांत आहे माहीत आहे का? तुम्हीं जेव्हां स्वतःचें अस्तित्व विसराल, तुमची मोठेपणाची कल्पना जेव्हां लयाला जाईल, तेव्हांच तुम्हांला वैभवश्री प्राप्त होईल. ती स्थिति वाट्याला येण्यासाठीं तुम्हीं शरणांगतीचा मार्ग स्विकारला पाहिजे. त्या स्थितीप्रत तुम्हीं गेलां म्हणजे तुम्हीं मार्गदर्शनाला योग्य आहांत असें समजून गुरु तुमचा वाटाड्या बनतो.

**शिष्य:** जो गुरु कानांत मंत्र सांगत नाहीं किंवा दुसरें कांहीं क्रियाकर्म करायला सांगत नाहीं; केवळ मुग्धता स्वीकारून तटस्थतेनें पहात रहातो व ती तटस्थता किंवा मुग्धताच जास्त परिणामकारक कशी होऊं शकते? शास्त्राचें वा धर्म ग्रंथांचें पठण व अध्ययन करण्यापेक्षां गुरूच्या मुग्धतेनें कार्य कसें पार पडत असतें?

**महर्षि:**—मुग्धता हीच सर्व शक्तिसंपन्न आहे. धर्म ग्रंथ व शास्त्रें पुराणें हीं कितीतरी आहेत. जोरजोरानें अमुक करा व तमुक करा, म्हणून तीं सांगत आहेत; परंतु त्यांच्या परिणामापेक्षां गुरूच्या मुग्धतेनेंच महत्तम कार्य पार पडत असतें. गुरु शांत व अबोल असतात; परंतु तेथेंच कृपेची पाखर असते. सारीं धर्मशास्त्रें व धर्मग्रंथ एका तराजूंत घातलीं व गुरूची शांतता-मुग्धता दुसऱ्या पारड्यांत घातली तर शांततेचें पारडेंच जास्त वजनदार ठरेल. ती मुग्धताच क्रांति घडवून आणणारी असते.

---


## लहान मुलाच्या आंकडीवर

जुनें आणि प्रसिद्ध औषध

जयकर्स चिल्ड्रन्स कन्व्हलशन् रेमेडी

सोल प्रो. जयकर ब्रदर्स

६६, मरीन ड्राईव्ह, मुंबई १

: स्टॉकिस्ट :

कांचनलाल वाडीलाल कं.

दवाबझार, मुंबई २

## अर्नाळकर ब्रदर्स

चष्म्यांचे व्यापारी

आमच्या येथें डोळ्यांची मोफत तपासणी करून शास्त्रोक्त चष्मे वेळेवर तयार करून देण्यांत येतील. सर्व प्रकारच्या फ्रेम्स् व कांचा मिळतील. एकदां आमच्या दुकानीं आल्यानंतर तुम्हीं आमचे कायमचे ग्राहक बनाल.

: मालक :

बाबूराव अर्नाळकर

२५५ गिरगांव रोड,

सरकारी तबेल्यासमोर, मुंबई ४

वि. सू:—श्रीसाईभक्तांसाठीं खास सवलतीचे दर

**कल्याणांचें उच्छिष्ट**:—एकदां कीर्तनांत श्री समर्थ म्हणाले, " आम्ही रांधतों तें कल्याण खातो आणि आम्हांस उच्छिष्ट देतो, तेव्हां कोठें कीर्तनांत रंग चढतो. "

मूर्खांनीं या म्हणण्याचा केवळ शब्दार्थ घेतला. समर्थ कल्याणांचें उष्टें खातात अशी ते निंदा करूं लागले ! शिष्याचें उष्टें खाणारा बुवा अशी निंदा होऊं लागली ! निंदेला काय ? ती लवकर पसरते, सर्वतो मुखीं होते आणि आवरावयाला कठीण जाते.

पण समर्थांच्या म्हणण्याचा भावार्थ असाः—आम्ही कविता करतों ती कल्याण मुखोद्गत करतो आणि मग आम्हांस वेळेवर सुचवितो. त्यायोगें आम्हांस आनंद होतो आणि कीर्तनांत रंग माजतो.

**समर्थांचा खलबत्ता**:—समर्थांना विडा लागत असे. विडा बारीक कुटून देण्याची कामगिरी शिष्य भोळारामाकडे असे. भोळाराम विडा खलबत्यांत न कुटतां स्वतः तोंडांत चावून बारीक करून समर्थांना देत असत. ही चुगली कोणी इतर शिष्यानें शिवाजीराजांच्याकडे केली, ती त्यांनीं समर्थांच्या कानावर घातली. तेव्हां समर्थांनीं राजे यांना म्हटलें कीं, ' भोळारामाकडे जाऊन खलबत्त्यासह विडा मागितला आहे असें सांगून खलबत्ताच घेऊन या ' राजांनीं जाऊन भोलारामाजवळ खलबत्ता मागितला. ' देऊंच का खलबत्ता ? ' असें म्हणून भोलारामांनीं सुरीनें स्वतःची मान कापून ती राजांच्या हातांत दिली ! राजे चकित झाले ! तो खलबत्ता घेऊन राजे समर्थांकडे गेले. समर्थ म्हणाले, 'सांगा राजे, या खलबत्त्यांत कुटलेला विडा खावा कां खाऊं नये ? जा. नेऊन ठेवा खलबत्ता जेथल्या तेथें.' राजांनीं त्याप्रमाणें नेऊन ठेविला. पण हात हालला आणि खलबत्ता किंचित् वाकडा ठेवला गेला ! तेव्हांपासून भोलारामांची मान थोडीशी वाकडी झाली.

याच भोलारामाची आणखी एक मजेदार कथा आहे. समर्थांना कफाची व्यथा जडली होती. पीकदाणी भरली म्हणजे कोणीतरी शिष्य ती धुवून आणून ठेवीत असे. एकदां जवळपास दुसरा कोणी शिष्य नव्हता म्हणून समर्थांनीं रामा नांवाच्या मंद बुद्धीच्या मुलास हांक मारून पीकदाणी साफ करून आणण्यास सांगितली. आपणांस समर्थांनीं काम सांगितलें म्हणून रामास आनंद झाला व ही कृपाच झाली असें त्यास वाटलें. हा पीकदाणींतला रस श्रीसमर्थ मुखींचा प्रसादच लाभला असा त्यानें विचार करून तो सारा रस गट्ट केला. आणि पीकदाणी धुवून जेथल्या तेथें नेऊन ठेविली. थोड्या वेळानें रामास मळमळूं लागलें. समर्थांना ही गोष्ट समजली. रामानें समर्थांच्या पायावर लोळण घेतली. मळमळणें थांबलें ! समर्थ म्हणाले, ' दुसरा कोणी शहाणा असता तर त्यास शिक्षाच केली असती. पण तुला काय शिक्षा करावी ? खरा भोळाराम आहेस.' तेव्हांपासून त्याचें नांव भोळाराम पडलें. पुढें त्यास समर्थांनीं महंती करावयास मारवाडप्रांतीं पाठविलें.

या भोळारामाचा मृत्यु समीप येऊन ठेपला तेव्हां त्याला विचार पडला. आपल्या देहांत श्रीसमर्थांचा प्रसाद गेला आहे, तेव्हां हा देह भस्मसात् होऊं नये. पण आपल्यांत

# गुरुमहिमा काय वर्णावा ?

अपार संसार-समुद्राच्या पार तरून जाण्यासाठीं श्रीगुरुचरणकमल ही एकच नौका आहे. तिचा आश्रय केला पाहिजे. गुरु व ब्रह्म ह्यांत किंचित्‌ही भेद नाहीं. ह्यांत भेद कल्पना करणें निरर्थक आहे. गुरु हा शिष्याला ज्ञानदान करून सच्चिदानंद सागरांत बुचकळून काढणारा आहे. त्रितापसंतप्त जीवांचा रक्षणकर्ता गुरुदेवच आहे. गुरु सच्चिदानंद ब्रह्मरूप आहे. ह्यांत संशय नाहीं. माता-पिता हे जन्म देणारे असल्यामुळें पूज्य आहेत, पण धर्म व अधर्म ह्यांचें ज्ञान करून देणारा गुरूच असल्यामुळें विशेष रूपानें पूज्य आहे. गुरूच पिता, गुरूच माता, गुरूच देव व गुरूच परमगति होय. भगवंत रुष्ट झाला असतां गुरूच रक्षण करूं शकतो, पण गुरु रुष्ट झाला असतां कोणीही रक्षण करूं शकणार नाहीं.

—गुरुगीता

गुरूच सर्व जगाचें व श्रेष्ठ तपाचेंहि मूळ आहे. जितेंद्रिय साधक गुरूच्या केवळ प्रसादानेंच मोक्ष मिळवूं शकतो. भक्तिशास्त्रांत गुरुभक्तीचा महिमा सर्वांत अधिक आहे. गुरुपूजेवांचून कोटीपुण्येंहि व्यर्थ आहेत.

—रुद्रयामल.

गुरूच अद्वितीय ब्रह्म, सर्वार्थ साधक श्रेष्ठतत्त्व होय. सर्व जगत्‌ गुरुमयच आहे. 'गुरु' हा द्व्यक्षरी शब्द ज्याच्या जिव्हाग्रावर राहतो, त्याला कसला मोह व वेदपाठाची तरी त्याला काय आवश्यकता आहे? गुरुमूर्तीच ध्यानाचें मूळ, गुरुचरण पूजेचें मूळ गुरुवाक्य मंत्राचें मूळ व गुरुकृपा ही सर्व सिद्धीचें मूळ आहे. गुरुच ब्रह्मा, गुरुच विष्णु व गुरुच महेश्वर होय. गुरूच अग्नि व सूर्य असून, गुरुच समस्त तीर्थ, यज्ञ, दान व तपोरूप आहे. हें सर्व जग गुरुमय आहे. ज्यानें श्रीगुरुचरणाचें पूजन केलें त्याला सर्व जगाचें पूजन घडलें; त्याला दानाची, तपाची व अन्य तीर्थ सेवनाची काय गरज आहे! समस्त ब्रह्मांडामध्यें जितकीं म्हणून तीर्थें आहेत, तीं सर्व गुरुचरणाच्या ठिकाणीं

---

पुरण्याची चाल नाहीं तेव्हां काय करावें ? त्यांनीं भूमीची प्रार्थना केली, 'तूंच सर्वांचा आधार आहेस. मला पोटांत घे!' त्यासरशी भूमि तडकली, द्विभागी झाली आणि निजात्मरंगीं मग्न होऊन भजन करीत भोळाराम आंत जाऊन बसले! धरणी पूर्ववत्‌ झाली.

वैसर्णे काशाचें ठेविला देह । आपण तों गुरुपदीं जाला तन्मय ।
होणें काशाचें स्वरूप चि स्वयें । स्वतःसिद्ध गुरुकृपें असे हो ।।
ते स्थानीं पृथ्वीला लंबाय छिद्र । असे अद्यापि पूजावया ।।

—श्रीदास विश्रामधाम

धन्य धन्य तो भोळाराम आणि धन्य त्याची गुरुभक्ति !

———

वास करितात. जो शिष्य नित्य गुरुपादोदक प्राशन करितो तो धर्मार्थकाममोक्ष समीप होतो. गुरुदेवाचा प्रसाद सेवन करण्यानें कोटीजन्मांचें पाप नाहींसें होतें.

—तंत्रशास्त्र

आचार्यांच्या दसपटीनें उपाध्याय, उपाध्यायाच्या दसपटीनें पिता व पित्याच्या अथवा सर्व पृथ्वीच्या दसपटीनें माता पूज्य होय. कारण मातेसमान जगांत कोणीही पूज्य नाहीं. परंतु मातापित्याहूनही श्रीगुरुदेव अधिक पूज्य आहेत. ह्याचें कारण असें कीं, मातापित्याच्या द्वारें केवळ नाशवंत असें स्थूल शरीर मिळत असतें; पण श्रीगुरूच्या द्वारें अजर व अमर असें आध्यात्मिक शरीर प्राप्त होतें. पित्याला प्रीतिकर असें कार्य केलें असतां प्रजापति संतुष्ट होतो; मातेला प्रिय अशा कार्यानें पृथ्वीची पूजा होते व गुरुचें प्रिय केल्यानें ब्रह्माची पूजा केल्यासारखी होते. ह्याकरितां मातापिता वगैरे सर्वांहून गुरु पूज्य आहेत. तात्पर्य, श्रीगुरुदेव हे जगांत पूज्यतम होत.

—महाभारत

मातृभक्तिद्वारा भूलोक, पितृभक्तिद्वारा अंतरिक्ष लोक व गुरुभक्तिद्वारा ब्रह्मलोक प्राप्त होत असतो. जो या तिघांचा आदर करितो, त्यास सर्व धर्मांचा आदर केल्याचें श्रेय मिळतें व जो त्यांचा अनादर करितो, त्याचे सर्व धर्म निष्फळ होऊन जातात. जो भक्त यावज्जीव गुरुसेवा करूं शकतो, त्याला शाश्वत असें ब्रह्मधाम प्राप्त होतें.

—मनु संहिता

विषयाचा संकल्प त्यागून काम जिंकावा, कामाच्या त्यागानें क्रोध जिंकावा, अर्थांमध्यें अनर्थाचें मूळ पाहून लोभ जिंकावा, तत्त्वविचार करून भय जिंकावें, महापुरुषाच्या सेवेनें दंभ जिंकावा, मौन धारणानें योगानें अंतराय विघ्नसमुदाय ) जिंकावें, आन्वीक्षिकी विद्येनें ( आत्मानात्म विचारानें ) मोक्ष व मोह जिंकावेत, कामादिकांच्या अनिच्छेनें हिंसा जिंकावी, कृपेच्या द्वारें भूतजन्य दुःख जिंकावें, समाधानाच्या द्वारें दैवोपसर्गजन्य दुःख जिंकावें, योगबलानें देहज-दुःख जिंकावें, सात्त्विक पदार्थांच्या सेवनानें निद्रा जिंकावी, सत्त्वगुणाच्या द्वारें रजतम जिंकावे व उपसमाच्या द्वारें सत्त्वगुण जिंकावा. परंतु साधकाच्या ठिकाणीं गुरु-भक्तीचा उत्कर्ष होईल तर त्या केवळ गुरुभक्तीच्या द्वारे वर सांगितलेल्या कामक्रोधादि सर्व वृत्ति व दुःखें शीघ्र जिंकता येतात.

—भागवत

ज्याप्रमाणें कुदळीनें खणलें असतां पाणी लागतें, त्याप्रमाणें गुरुगत विद्या गुरुसेवेनें प्राप्त होते.

—भगवान मनु

तद्विद्धि प्रणिपातेन प्रश्नेन सेवया—<br>
श्रद्धया लभते ज्ञानम्...

—श्रीभगवद्गीता

# आनंदमूर्तींची गुरुनिष्ठा

**************************

श्रीसमर्थ पंचायतनांतले चौथे आनंदमूर्ति. यांच्या गुरुभक्तीला तोडच नाहीं. हे मूळचे राहणारे आगळगांवचे. ह्यांचे गुरु रघुनाथ नाशिकचे राहाणारे असून साक्षात्कारी सत्पुरुष होते. त्यांनीं काशीहून चौवीस वेळां कावडीनें गंगोदक नेऊन रामेश्वरास अभिषेक केला होता व तितक्याच वेळां रामेश्वराहून सेतु आणून गंगेंत टाकला होता.

आपला मुलगा एका बुवाच्या नादीं लागला आहे म्हणून आनंदमूर्तींच्या वडिलांनीं मुलांस व नूतन बालकासह स्नुषेस घराबाहेर काढून लाविलें. तेव्हांपासून आनंदमूर्ति पत्नीसह गुरुत्वाचे संगतींत वसगडे येथें राहूं लागले. एके दिवशीं शिष्यास न कळवितां गुरु चालते झाले, ते गेले संकेश्वरास. बायकोस व मुलास मागें ठेवून आनंदमूर्ति एकटेच गुरूंच्या शोधार्थ निघाले. त्यांनीं त्यांना संकेश्वरास गांठलें व त्यांच्या चरणीं मस्तक ठेविलें. शिष्याची निष्ठा पाहून गुरुस आनंद झाला. गहींवरून त्यांनीं आनंद मूर्तींस आलिंगन दिलें. पुन्हां उभयतां वसगडे गांवीं आले.

### वृंदावन डोलत असे

असा कांहीं काळ आनंदांत गेल्यावर रघुनाथस्वामींनीं योगपीठ सिद्ध केलें आणि जड तनूचा त्याग करून परब्रह्मीं ज्योति मिळविली. आनंदमूर्तींनीं उत्तर विधान करून ब्रह्मनाळ येथें वृंदावन स्थापिलें आणि आपण स्त्री मुलांसह त्या वृंदावनाची सेवा करीत राहिले. आनंद मूर्तींचें गुरुभक्ति प्रेम काय असेल तें खरें; पण त्यांच्या प्रेमामुळें रामनवमीच्या दिवशीं पूजा होत असतां, तें वृंदावन डोलत असे.

आनंद मूर्तींची गुरुनिष्ठा जगास कळून येण्याचा योग आला. ते आपल्या संबळींत गुरूंच्या पायांतील प्रत्यक्ष चर्मी जोडा ठेवून गुप्तपणें प्रत्यहीं पूजा करीत असत! ही त्यांची गुप्तपूजा प्रकट होण्याचा अचानक प्रसंग आला.

### धन्य ती गुरुभक्ति

वडगांवीं आपल्या गुरूंच्या पुण्यतिथीला येण्याविषयीं जयरामांनीं सर्वांना आमंत्रण केलें. त्याप्रमाणें समर्थादि सर्व संत उपस्थित होते. आनंदमूर्तीहि गेले होते. संबळी मठांत ठेवून ते स्नानास गेले. इकडे पहिली पंगत बसण्याची वेळ आली. तेव्हां मंडळीस उठण्यास सांगितलें असतां, एक गृहस्थ म्हणाले, 'भगवद्गीतेचा एक अध्याय तरी वाचल्यावाचून मीं भोजन करीत नसतों. मी माझी पोथी आणण्यास विसरलों आहें, कोणाची तरी द्या; अध्याय वाचून येतोंच.' तेव्हां जयराम म्हणाले, 'आनंदमूर्ति स्नानास गेले आहेत. त्यांच्या संबळींत पोथी असेल ती घेऊन वाचा आणि त्वरित चला.' त्याप्रमाणें त्या गृहस्थानें संबळी उघडली आणि गीता हातीं घेतली.—गीता होतीच कोठें? जोड्याची गीता झाली होती. एक अध्याय वाचला मात्र आणि त्या गृहस्थास समाधीच लागली!

मंडळी जमा झाली. जयरामांनीं त्यांच्या नेत्रांस पाणी लावलें. तो गृहस्थ सावध झाला आणि म्हणाला—

गीता वाचितां । एकाएकीं हो आवस्था ।
माझी मीच आत्मा आईता । नाहीं वार्ता दुजयाची ।।
गीता नव्हे ती अक्षर । प्रत्यक्ष दिसतसे जानकीवर ।
अनुग्रह जाहला साचार । काय विचार सांगूं तो ।।
उमस खाऊं नेदी क्षण । अवघे व्यापिलें चैतन्य ।
आतां कैचे गीतापठण । जाहलें मन उन्मन तें ।।

हें त्याचें बोलणें ऐकूण सर्वजण आश्चर्य करीत आहेत, इतक्यांत स्नानाहून आनंदमूर्ति आले. आपली संबळी उघडलेली त्यांना दिसली. ते खजिल झाले आणि खालीं मान घालून, हात जोडून जमलेल्या मंडळीस म्हणाले. 'मला क्षमा करा, माझा अपराध पोटांत घाला, मी मूढ आहें.'

पादरक्षा श्रीस्वामीच्या । पूजन करितों नित्य साचा ।।
भ्रष्ट असे मी ठाईंचा । स्पर्श चर्मांचा नित्य मज ।।

मंडळींना प्रथम कांहींच बोध होईना. मग कळलें, आपल्या गुरुच्या पायांतील जोडा संबळींत ठेवून त्याची आनंदमूर्ति नित्य पूजा करीत आणि याप्रसंगीं त्या जोड्याची गीता झाली होती! हें कळून आलें. धन्य धन्य ही गुरुभक्ति! असे सर्वांनीं उद्‌गार काढले. वैदिक आणि पंडित होते तेहि बोलले कीं, आम्हीं संतांना व्यर्थ नांवें ठेवितों; त्यांची लीला अगम्य होय! त्या दिवशीं गांवभर लोकांत आनंदाचा सागर उचंबळला होता! ज्याच्या त्याच्या तोंडीं आनंदमूर्तींच्या अपूर्व गुरुभक्तीचाच विषय होता. आनंदमूर्तींनीं गुरुभक्तीची सीमा गांठली! धन्य धन्य ते गुरु आणि धन्य धन्य तो सच्छिष्य!!!

—*—

**जैसें डोळ्यां अंजन भेटे । ते वेळीं दृष्टीसी फांटा फुटे ।।**
**मग वास पाहिजे तेथें प्रगटे । महानिधी ।।** ज्ञानेश्वर.
ही कदाचित् कविकल्पना असेल—पण डोळे काळजीपूर्वक तपासून अचूक चष्मा बनवून घेतल्यास, शतायुषी झालांत तर दृष्टि स्वच्छ रहाते हें सत्य आहे.
याकरितां **निर्दोष चष्मे** बनविणार
# शेंडे आणि कंपनी
**बोरभाट लेन, गिरगांव, मुंबई ४** यांचा सल्ला घेऊन निरधास्त रहा.
बाहेरगांवीं फ्रेम्स, लेन्सीस् व प्रिस्क्रिप्शनप्रमाणें चष्मे बनवून ऑर्डरप्रमाणें पाठवूं.

# दत्तावतार नरसिंह सरस्वती

## गुरूवरील निष्ठा फळास आली

( पूर्वार्ध )

ज्ञानदेवांच्या वास्तव्यानें पूनित झालेल्या आळंदी नगरींत श्रीनरसिंह सरस्वती यांचा जन्म झाला. ते श्री माणिकप्रभू व अक्कलकोटचे स्वामी समर्थ यांच्या प्रमाणेंच साक्षात् दत्तावतार होते. त्यांना आमचे साष्टांग प्रणिपात असोत. श्रीगुरूचरित्राच्या शेवटीं ज्या श्री नरसिंह सरस्वतींचा उल्लेख करण्यांत आलेला आहे तेच हे श्रेष्ठ पुरुष. त्यांचें योगसामर्थ्य अचाट होतें. हे दत्तावतार असल्याचें प्रथम राधाकृष्ण स्वामींनीं ओळखलें.

### स्वामीभक्त रामा हवेली

महाराज आळंदींत असतां तेथें त्यानीं लोककल्याणार्थ नाना चमत्कार केले. त्या सर्वांची येथें माहिती करून देणें कठीण आहे. पूर्वी आळंदींत रामा हवेली या नांवाचा स्वामींचा भक्त रहात असे. स्वामीवर त्यांची अढळ निष्ठा. त्याचें वय अवघें सतरा वर्षांचें होतें. मधुर कंठाची त्याला ईश्वरदत्त देणगी होती. जणुं काय कोकिळेच्या कर्ण-मधुर कंठ ! त्यामुळें तो भजन करूं लागला म्हणजे तें फार चांगलें रंगत असे. सारे श्रोते भजनानंदांत डुंबून डोलत असत.

एकदां आळंदींत महामारीचा रोग सुरू झाला व त्यानें कहर करून सोडिला. लोक पटापट मरूं लागले. सर्वांच्या तोंडचें पाणी पळालें ! काय करावें हें सुचेना.

त्या महामारीची फेरी रामाच्या घरीं झाली. रामाला तिनें धरिलें. बिचाऱ्याची आई घाबरीघुबरी झाली. एकुलता एक मुलगा ! हातचा जाण्याची वेळ येऊन ठेपली. त्याला उतार पडावा म्हणून देवाधर्मास नाना प्रकारचे नवस केले. कांहीं उपयोग झाला नाहीं. रामानें शेवटीं 'राम' म्हटला !

आई धाय मोकलून रडूं लागली. राम म्हणजे तिचें सर्वस्व होतें. घरादाराचा सर्वाधार तोच होता. तिला कांहीं सुचेना. ती गडबडा जमिनीवर लोळूं लागली. तोंडांत माती घालून घेऊं लागली. वेड्या पिशासारखी तिची स्थिति झाली.

सूर्यास्ताची वेळ होत आली, तरीहि तिच्या घराकडे कोणी फिरकलें नाहीं. महामारीचें भय सर्वांना भारी वाटत होतें. त्यामुळें कोण कोणाकडे जात नसे. अशा स्थितींत घरांतून प्रेत हलवायचें कसें याची विवंचना पडली होती. किती दुर्धर प्रसंग होता तो ! जातवाले होते ते म्हणूं लागले कीं, एवढी घाई कशाला ? रात्रभर राहिना का प्रेत घरांत ! उद्यां लावूं त्याची विल्हेवाट ! 'बुद्धिः कर्मानुसारिणी'

त्याप्रमाणें कपड्यानें झांकून तें प्रेत तसेंच घरांत ठेवण्यांत आलें. रामाची बायको व आई दोघेही परम दुःखी ! त्या प्रेताजवळ पडून राहिल्या. काय करणार बिचाऱ्या !

## रामाशिवाय भजन कसलें ?

नरसिंह सरस्वती अंतर्ज्ञानी. त्यांच्याकडे रोज भजन व्हायचें व त्यांत रामा असावयाचा व त्याच्यामुळें भजनाला रंग चढावयाचा. तो एकादशीचा पुण्यदिवस होता. आपल्या सर्व भक्तांस उद्देशून नरसिंह सरस्वती म्हणाले, 'आज जोरजोरांत भजन करा; परंतु आज आमचा राम कुठें दिसत नाहीं. त्याच्याशिवाय भजन रंगायचें कसें ! जा पाहूं कोणी तरी आणि त्याला लौकर घेऊन या.

महाराजांची आज्ञा झाली खरी; परंतु राम होता कुठें ? महाराजांचे एक भक्त बाळाबुवा म्हणून होते. त्यांनीं बोलण्याचा धीर केला व म्हणाले, 'महाराज ! राम कुठें आहे ? तो निजधामास निघून गेलेला आहे. रात्र झाली म्हणून त्याचें प्रेत झांकून ठेवण्यांत आलें आहे !'

तें ऐकून महाराज हास्यवदन करून म्हणाले, 'लबाड आहे तो ! त्यानें भलतेंच कांहींतरी सोंग केलें असावें ! जा पाहूं कोणीतरी त्याच्या घरीं लौकर आणि त्याला आहे तसा येथें घेऊन या. तो नाहीं तर भजन कसलें ? मग त्यांत राम आढळणार नाहीं. चला ! उठा आणि त्याला त्वरित घेऊन या.'

त्यावर कोण काय बोलणार ? काय बोलावे हें कोणालाही सुचेना. सर्वजण एकमेकांकडे टकमक पाहूं लागले. ती त्यांची स्थिति पाहून महाराज पुन्हां ओरडले, "जा पाहूं लौकर कोणी तरी रामाच्या घरीं आणि त्याला इथें घेऊन या. तो आलाच पाहिजे इथें ! त्याला झाला असेल महामारीचा उपद्रव व म्हणून तो गळसांडला असेल ! त्याला औषध द्या म्हणजे तो ताजातवाना होईल."

असें बोलून महाराजानीं बाळाबुवांच्या हातीं एक पुडी दिली. एवढ्यावरच न थांबतां महाराज आणखी म्हणाले, "हें पहा ! त्याला मोठमोठ्यानें ओरडून सांगा कीं, मी लौकर बोलावलें आहे. माझें नांव कानीं पडतांच तो ताडकन् उठून बसेल ! जा, जा ! अगदीं लौकर जा !"

बाळाबुवांचा महाराजांच्या बोलण्यावर असीम विश्वास. गुरुमाउलीचा शब्द खोटा कसा होईल. गुरुमाउली सर्वांना तारणारी. बाळाबुवा रामाच्या घरीं तीराच्या वेगानें धांवत आले. दोन प्रहर रात्रीचा समय झालेला होता. जिकडेतिकडे भयाण देखावा दिसत होता.

## गुरुकृपेचा आधार

बाळाभाऊ रामाच्या घरीं आले. त्यांना पहातांच रामाची आई मोठमोठ्यानें आक्रोश करूं लागली. नाना परीनें त्याचे गुण आळवून ती रडत होती. "काय सांगूं हो ! माझी म्हातारीची काठी देवानें हिरावून नेली. आतां कोणाच्या आधारावर मी उभी

राहूं ? हें दुःख आतां मी कसें सहन करूं ? काय करूं ! काळानें डाव साधला; माझा हिरा हिरावून नेला. त्या काळतोंड्याला दयामाया मुळींच कशी नाहीं ? "

कसें त्या दुःखी माणसाचें समाधान करायचे ? कोणाची छाती होती तिच्यापुढें उभें राहून बोलण्याची !

परंतु बाळाभाऊना गुरुजींचा आधार होता. त्या आधारावर ते बलवान् झाले होते. त्या हताश स्थितींत गुरुजींच्या शब्दामुळें त्यांच्याठायीं बल उत्पन्न झालें. सभोंवार पसरलेल्या काळोखांत त्यांना तेजस्वी प्रकाशकिरण दिसूं लागला. ते हिंम्मत करून पुढें सरसावले व रामाच्या अंगावर आपला प्रेमळ हात ठेऊन मोठ्यानें म्हणाले, ' अरे रामा! झोपलास काय असा ! ऊठ बेट्या ! वाट पहाताहेत आपले गुरुजी तुझी ! तूं नाहीं तर कसलें भजन ! आज तर भजनाचा मोठा थाटमाट केला आहे आणि तूं गैरहजर ! मग रंग भरावा कसा भजनांत ! चल पाहूं, ऊठ लौकर. वाट पहाताहेत गुरुजी तुझी !'

आणि काय नवल ! एखादा माणूस झोपेंतून उठावा, तसा रामा खडबडून जागा झाला व ताडकन् उठून बसला !

किती आश्चर्य वाटलें आहे त्यावेळीं साऱ्या लोकांना ! ती एक अघटीत घटना होती. नरसिंह सरस्वतीच्या कृपाप्रसादामुळें ही घटना घडली याची सर्वांना जाणीव झाली. सर्वजण म्हणूं लागले कीं, केवढा मोठा आहे हा यांचा अधिकार !

काळावरहि ते सत्ता गाजवूं शकतात, त्यापरतें काय सांगायचें ? सारेजण महाराजांचा जयजयकार करूं लागले. नरसिंह सरस्वती म्हणजे साक्षात् परमेश्वर, साक्षात् त्रिमूर्ती दत्तात्रय ! प्रेतांत जीवनकळा आणावयाची हें साधें का सामर्थ्य !

### निष्ठेचें फळ मिळालें

राम उठलेला पाहून त्याच्या बायकोला व आईला किती आनंद झाला असेल याची सहृदय वाचक आपणच कल्पना करावी. आईनें धांवत जाऊन प्रेमभरानें रामाला कडकडून मिठी मारली व म्हणाली, ' माझ्या लेकरा ! आज केवढा घात झाला होता ! परंतु गुरुदेवाला आमची दया आली व माझें हें रत्न मला मिळालें ! गुरुमहाराजांनीं तुला पुनर्जन्म दिला; केवढे हे त्यांचे उपकार आमच्यावर ! ते जन्मोजन्मीं फिटणार नाहींत ! "

जसें कांहीं कांहींच घडलें नाहीं अशा रीतीनें राम वागत होता. तो आईला म्हणाला, ' सगळें राहूं द्या. मला यावेळीं भूक भारी लागली आहे. मला खायला द्या पाहूं कांहीं तरी ! मला जाऊं द्या भजनाला ! '

मग रामाला आंबोळ घालण्यांत येऊन त्याची भूक शांत करण्यांत आली; सारे-जण नंतर रामाला श्री नरसिंह सरस्वती वाट पहात बसले होते त्या ठिकाणीं घेऊन आले.

गुरुमूर्तीचें दर्शन होतांच राम गडबडां लोळूं लागला. आपली कृतज्ञता व प्रेमभाव कशा रीतीनें प्रगट करावा हें त्याला सुचेना. त्यानें पुन्हां पुन्हां लोटांगणें घातलीं तरी त्याचें समाधान होईना.

# शांति मंत्राचा भावार्थ

****************************

**ओम् सहनाववतु—**

दोघांचेंही एकाच वेळीं रक्षण होवो. येथें दोघांचें म्हणजे गुरु आणि शिष्य या दोघांचें; तसेंच गरीबांचें आणि श्रीमंतांचें, स्त्रियांचें व पुरुषांचें आणि निर्बलांचें व समर्थांचें, या ज्या जोड्या आहेत, त्यांतील ऐकेका जोडींतील जर का एक दुसऱ्याला दामटण्याचा प्रयत्न करूं लागला तर त्यांपैकीं एकालाही शांतता लाभणार नाहीं, हें निश्चित समजावें.

**सह नौ भुनक्तु**

दोघांनींहि सहकार्यानें एकमेकांच्या हातांत हात घालून सुख भोगावें. येथें दोघांनीं म्हणजे सर्वांनीं, सर्व समाजानें. आपल्या शरिरांतील कोणताहि भाग विशेष जाड झाला—सुजला तर त्यामुळें साऱ्या शरिरालाच सुख लाभणार नाहीं; त्याचप्रमाणें समाजांत एका माणसानें गादी तक्क्यावर बसावें; खुशाल लोळावें आणि दुसऱ्यानें ऊन पाऊस न पहातां खपावें, मोलमजुरी करावी व काळोख्या झोंपडींत पडून रहावें, अशा प्रकारची तफावत ज्या समाजांत आहे, तो समाज सुखी म्हणतां येणार नाहीं. तेव्हां श्रीमंत व गरीब

---

गुरुमहाराज म्हणाले, ' किती लबाड आहेस रे ! कुठें होतास इतका वेळ ? सांग पाहूं मला !

राम म्हणाला, ' गुरुराया ! आपण त्रिकालज्ञ ! मी काय सांगणार आपणांस ? आपण करुणासागर अहांत. माझी व माझ्या माणसांची आपणास दया आली व आपल्या कृपेनें हे पाय मी पुन्हां पहात आहें.'

महाराज म्हणाले, ' तुझी निष्ठा दांडगी. देव कां नाहीं तुला पावणार ? त्यानेंच तुझ्यावर आलेलें संकट दूर केलें. यापुढें तूं दीर्घायुषी होशील. संतती व संपत्ति यांचें भरपूर सुख तुझ्या वाट्याला येईल. कांहीं चिंता करूं नकोस. मात्र श्रीहरीचरणीं बळकट निष्ठा ठेव, कोणत्याही परिस्थितींत ती निष्ठा डळमळूं देऊं नकोस. '

राम किती भाग्यवान् ! गुरुमाउली त्याच्यावर प्रसन्न झाली व तिनें त्याला जो वर दिला तो सर्व परीनें त्याच्या कल्याणाचा होता. गुरुजींच्याठायीं अढळ निष्ठा ठेवल्यामुळेंच हें भाग्य त्याच्या वाट्यास आलें.

त्या रात्रीं भजन नेहमींपेक्षां फारच रंगलें. सर्वांचीं अंतःकरणें आनंदातिशयानें ओतप्रोत भरून गेलीं होतीं. गुरुमाऊली श्रीनरसिंह सरस्वती यांच्या जयजयकारानें सारें वातावरण दुमदुमून गेलें होतें.

हा भेदभाव जेथें नष्ट झाला आहे व सारेच जेथें अंगमेहनत करून मिळवितात व खातात पितात, तेथेंच सुख व समाधान नांदणें शक्य आहे. तसें आपण बनलें पाहिजे. त्यासाठीं भगवंताची प्रार्थना केली पाहिजे कीं, हे भगवंता! आम्हीं सुख भोगूं ते एकमेकांच्या सहकारानें व एकमेकांच्या हातांत हात घालून भोगूं, असें कर.

**सहवीर्यं करवावहैः—**

आम्हीं पराक्रम गाजवूं तो एकमेकांच्या सहकारानें गाजवूं. याचा अर्थ रशिया ब्रिटननें एकजूट करून जर्मनीला हटवावयाचें असा मात्र नव्हे. सहकारानें, व्तोबरीनें म्हणजे सर्व जगाचा सहकार संपादन करून प्रत्येकानें आपापल्या कुवतीप्रमाणें शांतता स्थापन करण्यांत भाग घ्यावयाचा.

**तेजस्विना वधीतमस्तु—**

आमच्या शिक्षणांत व अध्ययनांत तेज भरपूर असूं दे. त्यामुळें आमच्यांतहि तेज निर्माण होवो.

**मा विद्विषावहै—**

आम्हीं कोणाचाही द्वेष करणार नाहीं असें कर. आम्हीं सर्वजण एकत्र आलो ते का एकमेकांचा द्वेष करायला का एकमेकांचा पाडाव करायला? आम्हीं एकमेकांचा द्वेष, मत्सर कदापि करणार नाहीं.

**ओम् शांतिः शांतिः शांतिः**

'शांति' हा शब्द आपण तीन वेळां उच्चारला. कारण आमच्या शरिराला मनाला व आत्म्याला शांति मिळावी हा त्यांत हेतू आहे. एवढेंच नव्हे तर स्वतःला आमच्या समाजाला व अखिल जगताला शांति मिळावी हा व्यापक दृष्टिकोण त्या तिहेरी प्रार्थनेंत आहे. तसेंच आपणास शांति मिळवायची आहे ती तीन प्रकारची (१) आधिभौतिक, (२) आधिदैविक व (३) आधिभौतिक.

परंतु ही शांतता कशी लाभणार? केवळ या मंत्राचा उच्चार केल्यानें तिचा लाभ होईल का? नाहीं. केवळ मंत्रोच्चारानें कांहींएक वळणार नाहीं. त्यासाठीं वर उल्लेखिलेल्या पांचही क्रिया आपण आचरणांत आणण्यासाठीं मनापासून झटलें पाहिजे. तसें आचरण घडलें तर शांततेचें स्वप्न साकार होईल, नाहीतर नाहीं.

या गोष्टींचें सतत शिक्षण मिळालें पाहिजे; तसे संस्कार बाळपणापासून घडत गेले पाहिजेत. मन द्वेषरहित झालें पाहिजे. आणि हें सर्व घडून यावें, यासाठीं आपण मनोभावें ईश्वराची प्रार्थना केली पाहिजे.

— रविशंकर महाराज

———

श्रीरंगनाथस्वामीकृत —

# श्री गु रु गी ता

भगवान् श्रीशंकरांनीं भगवति श्री पार्वतीस प्रथम गुरुगीता सांगितली. ती मूळ संस्कृतांत आहे. श्री. रामचंद्र कृष्ण कामत यांनीं संशोधिलेल्या श्रीगुरुचरित्राच्या पोथींत एका अध्यायांत तिचा समावेश करण्यांत आला आहे. श्रीरंगनाथ स्वामींनीं तिचा सुंदर आणि रसाळ ओवीबद्ध प्राकृतांत अनुवाद केला. पुढील आठवड्यांत गुरुपौर्णिमा येत आहे. या गुरुगीतेचें वाचन, पठण गुरुभक्तांस निःसंशय उद्बोधक ठरून आनंद, सुख आणि लाभदायक होईल अशी आशा आहे.

— संपादक

श्रीगणेशाय नमः । श्रीसरस्वत्यै नमः ।। श्रीगुरुभ्यौ नमः । श्रीसद्‌गुरुनिजानंदाय
नमः ॥ ॐ नमो सद्‌गुरु परब्रह्म । तूं निर्विकल्प कल्पद्रुम । हरहृदयविश्रामधाम । निजमूर्ति
राम तूं स्वयें ।। १ ।। तुझा अनुग्रह जयां घडे । तयां नाहीं कांहीं सांकडें । दर्शन मोक्षद्वार
उघडे । तुझेनि पडिपाडें तूंचि तूं ।। २ ।। कोणे एके दिवशीं । श्रीसदाशिव कैलासीं ।
ध्यानस्थ असे तो मानसीं । पुसे तयासीं पार्वती ।। ३ ।। जयजया जी परात्परा । जगद्‌गुरु
कर्पूरगौरा । गुरुदीक्षा निर्विकारा । श्रीशंकर मज देईं ।। ४ ।। कवणें मार्गें जी स्वामी ।
जीव परब्रह्म होती तें मी । पुसतसें तरी सांगिजे तुम्हीं । अंतर्यामीं कळे ऐसें ।। ५ ।।
कृपा करावी अनाथनाथा । म्हणोनि चरणीं ठेविला माथा । नासोनियां भवव्यथा ।
कैवल्यं पथा मज दावीं ।। ६ ।। ईश्वर म्हणे वो देवी । तुझी आवडी मातें वद्वी ।
लोकोपकारक प्रश्न पूर्वीं । देवीं दानवीं जो न केला ।। ७ ।। तरी दुर्लभ या त्रिभुवनांत । तें
तूं ऐके वो सुनिश्चित । सद्‌गुरु ब्रह्म सदोदित । सत्य सत्य वरानने ।।८।। वेद शास्त्र पुराण ।
मंत्रतंत्रादि विद्या नाना । करितां तीर्थव्रत-तप-साधना । भवबंधमोचना न पवती ।। ९ ।। शैव
शाक्ति आगमादिकें । अनेक मतें अपभ्रंशकें ।। समस्त जीवां भ्रांतिदायक। मोक्षप्रापकें नव्हतीच
।।१०।। जया चाड पराभक्ति । तेणें सद्‌गुरु सेवावा एकांतीं ॥ गुरुतत्त्व न जाणती । मूढमती
जन कोणी ।। ११ ।। होवोनी निःसंशय । सेवावे सद्‌गुरुपाय ।। भवसिंधु तरणोपाय । तत्काळ
होय जडजीवां ।। १२ ।। गूढ अविद्या जगन्माया । अज्ञान संहारित जीवा या । मोहांधकारा
गुरुसूर्या- सन्मुख यावया मुख कैंचें ।। १३ ।। जीव ब्राह्मत्व त्याचिये कृपा । होती, निरसुनी
सर्व पापा । सद्‌गुरु-स्वयंप्रकाशदीपा । शरण निर्विकल्पा रिघावें ।। १४ ।। सर्व तीर्थांचें माहेर
सद्‌गुरुचरणतीर्थ निरंतर । सद्भावें सच्छिष्य नर । सेवितां परपार पावले ।। १५ ।। श्रोत्रिण

गुरुकृपा ॥ ४३ ॥ सप्तसिंधु अनेक तीर्थी । स्नानपानें जे फलप्राप्ती । एक बिंदूसम न पवती । सद्‌गुरुचरणतीर्थाच्या ॥ ४४ ॥ ज्ञानेवीण सायुज्यपद । अलभ्य लाभे अगाध । सद्‌गुरुभक्तीनें प्रबोध । स्वतःसिद्ध पाविजे ॥ ४५ ॥ सद्‌गुरुहूनि परात्पर । नाहीं नाहीं वो साचार । 'नेति' शब्दें निरंतर । श्रुतिशास्त्रें गर्जती ॥ ४६ ॥ मदाहंकारगर्वेकरुनी । विद्यातपबळान्वित होवोनि । संसारकुहरावर्ती पडोनि । नाना योनी भ्रमताति ॥ ४७ ॥ न मुक्त देवगणगंधर्व । न मुक्त यक्षचरणादि सर्व । सद्‌गुरुकृपेनें अपूर्व । सायुज्यवैभव पाविजे ॥ ४८ ॥ ऐके वो देवी ध्यानसुख । सर्वानंदप्रदायक । मोहमायार्णवतारक । चित्सुखकारक श्रीगुरु ॥ ४९ ॥ ब्रह्मानंद परमाद्भुत । ज्ञानबिंदुकलातीत । निरतिशयसुख संतत । साक्षभूत सद्‌गुरु ॥ ५० ॥ नित्य शुद्ध निराभास । नित्यबोध चिदाकाश । नित्यानंद स्वयंप्रकाश । सद्‌गुरु ईश सर्वांचा ॥ ५१ ॥ हृदयकमळीं सिंहासनीं । सद्‌गुरुमूर्ति चिंतावी ध्यानीं । श्वेतांबर दिव्यभूषणीं । चिद्रत्नकिरणीं सुशोभित ॥ ५२ ॥ आनंदमानंद प्रसन्न । ज्ञानस्वरूप निजबोधपूर्ण । भवरोगभेषज जाण । सद्वेद्य चिद्धन सद्‌गुरु ॥ ५३ ॥ सद्‌गुरुपरतें अधिक कांहीं । आहे ऐसा पदार्थ नाहीं । अवलोकितां दिशा दाही । न दिसे तिंही त्रिभुवनीं ॥ ५४ ॥ प्राज्ञाबळें प्रत्योत्तर । गुरुसि विवादती जे नर । ते भोगिती नरक घोर । यावचंद्र–दिनमणीं ॥ ५५ ॥ अरण्य निर्जल स्थानीं । भ्रमती ब्रह्मराक्षस होवोनी । गुरूसी बोलती उद्धट वाणी । एकवचनी सर्वदा जे ॥ ५६ ॥ क्षोभतां देव ऋषि काळ । सद्‌गुरु रक्षी न लगतां पळ । दीननाथ दीनदयाळ । भक्तवत्सल सद्‌गुरु ॥ ५७ ॥ सद्‌गुरुचा क्षोभ होतां । देव ऋषिमुनि तत्त्वता । रक्षिती हे दुर्वार्ता । मूर्खेहि सर्वथा नायकती ॥ ५८ ॥ मंत्रराज हे देवी । 'गुरु' हीं दोनी अक्षरें बरवीं । वेदार्थवचनें जाणावीं । ब्रह्मपदवी प्रत्यक्ष ॥ ५९ ॥ श्रुतिस्मृति न जाणती । ( परी ) गुरुभक्तीची परम प्रीति । ते संन्यासी निश्चितीं । इतर दुर्मति वेषधारी ॥ ६० ॥ नित्य ब्रह्म निराकार । निर्गुणबोध परात्पर । तो सद्‌गुरु पूर्णावतार । दीपासि दीपांतर नाहीं जैसें ॥ ६१ ॥ गुरुप्रसादें निजात्मदर्शन स्वानंदे । पावोनियां पूर्ण पदें । पेलती दोंदे मुक्तीसी ॥६२॥ आब्रह्मस्तंबपर्यंत । स्थावरजंगमादि पंचभूतें । सच्चिदाननंदाद्वय अव्यक्त । अच्युदानंत सद्‌गुरु ॥६३ ॥ परात्परतर ध्यान । नित्यानंद सनातन । हृदयीं सिंहासनीं बैसवून । चित्तीं चिंतन करावें ॥६४॥ अगोचर अगम्य सर्वगत । नामरुपविवर्जित । निःशब्द जाण निभ्रांत । ब्रह्म सदोदित पार्वती ॥६५॥ अंगुष्ठमात्र पुरुष । हृदयीं ध्यातां स्वप्रकाश । तेथें स्फुरती भाव-विशेष । निर्विशेष पार्वती ॥६६॥ ऐसें ध्यान करितां नित्य । तादृश होय सत्य सत्य । कीटकी- भुकुटीचें निमित्य । तद्रूप झाली ते जैशी॥६७॥ अवलोकितां तयाप्रति । सर्वसंगविनिर्मुक्ति । एकाकी निःस्पृहता शांति । आत्मस्थितीं रहावें ॥६८॥ सर्वज्ञपद त्या बोलती । जेणें देहीं ब्रह्म होती । सदानंदे स्वरूपप्राप्ति । योगी रमती पैं जेथें ॥६९॥ उपदेश होतां पार्वती । गुरुमार्गी होय मुक्ति । म्हणोनि करावी गुरुभक्ति । हें तुजप्रति बोलतसें ॥७०॥ जें मी बोललों तुज । तें गुजाचें निजगुज । लोकोपकारक सहज । हें तूं बुझ वरानने ॥ ७१ ॥ लौकिक कर्म तें हीन।

पापपंकाचें । ज्ञानतेज करी साचें । वंदितां चरणतीर्थ सद्गुरुचें । भावाब्धीचें भय काय ॥१६ अज्ञानमूलहरण । जन्मकर्मनिवारण । ज्ञानसिद्धीचें कारण । गुरुचरण-तीर्थ तें ॥ १७ ॥ गुरुचरणतीर्थ प्राशन । गुरुआज्ञा उच्छिष्टभोजन । गुरुमूर्तीचें अंतरीं ध्यान । गुरुमंत्र वदनीं जपे सदा ॥ १८ ॥ गुरुसान्निध्य तो काशीवास । जान्हवी चरणोदक निःशेष । गुरु विश्वेश्वर निर्विशेष । तारकमंत्र उपदेशिता ॥ १९ ॥ गुरुचरणतीर्थ पडे शिरीं । प्रयागस्नान तें निर्धारीं । गयागदाधर सबाह्यांतरीं । सर्वांतरीं साधका ॥ २० ॥ गुरुमूर्ति नित्य स्मरे । गुरुनाम जपे आदरें । गुरुआज्ञापालक नरें । नेणिजे दुसरें गुरुविना ॥ २१ ॥ गुरुस्मरण मुखीं राही । तोचि ब्रह्मरूप पाही । गुरुमूर्ति ध्यानी वाहे । जैशी कां हे स्वैरिणी ॥ २२ ॥ वर्णाश्रमधर्म सत्कीर्ति । वाढवावी सद्वृत्ति । अन्यत्र त्यजोनियां गुंती । सद्गुरुभक्ति करावी ॥ २३ ॥ अनन्यभावें गुरुसी भजतां । सुलभ परमपद तत्वतां । तस्मात्सर्वप्रयत्नें आतां । सद्गुरुनाथा आराधीं ॥ २४ ॥ गुरुमुखींचें महावाक्य—बीज । गुरुभक्तीस्तव लाभे सहज । त्रैलोक्यीं नाचे भोज । तो पूज्य होय सुरनरां ॥ २५ ॥ गुकार तो अज्ञानांधकार । रुकार वर्ण तो दिनकर । स्वयंप्रकाशतेजासमोर । न राहे तिमिर क्षणभरी ॥ २६ ॥ प्रथम गुकार शब्द । गुणमयी मायास्पद । रुकार तो ब्रह्मानंद । करी विच्छेद मायेचा ॥ २७ ॥ ऐसें गुरुपद श्रेष्ठ । देवां दुर्लभ उत्कृष्ट । गणगंधर्वादि वरिष्ठ । महिमा स्पष्ट नेणती ॥ २८ ॥ शाश्वत स्वयें सर्वदाही । गुरुपरतें तत्त्व नाहीं । कायावाचा मनें पाहीं । जीवित तेंहि समर्पावें ॥ २९ ॥ देहादिभुवनत्रय समस्त । इतर पदार्थ नाशिवंत । वंचोनियां विमुख होय । अधःपात घडे तया ॥ ३० ॥ म्हणोनि आराधावा श्रीगुरु । करोनि दीर्घदंड नमस्कारु । निर्लज्ज होऊनियां परपारु भवसागरु तरावा ॥३१॥ 'आत्मदारादिकं चैव'। निवेदन करूनि सर्व । हा नाहीं जयां अनुभव । तयांस वाटे अभिनव वरानने ॥ ३२ ॥ जे संसारवृक्षारूढ झाले । पतन नरकार्णवीं पावले । ते गुरुरायें उद्धरिले । सुखी केले निजभजनीं ॥ ३३ ॥ ब्रह्मा विष्णु सदाशिव । गुरुरूप तें स्वयमेव । गुरु परब्रह्म सर्वथैव । गुरुगौरव न वर्णवे ॥ ३४ ॥ अज्ञानतिमिरें अंध । ज्ञानांजन—शलाका प्रसिद्ध । दिव्य चक्षु शुद्धबुद्ध । महानिधि दाखविला ॥ ३५ ॥ अखंड मंडलाकार । जेणें व्यापिलें चराचर । तये पदीं केलें स्थिर । नमस्कार तया गुरुवर्या ॥ ३६ ॥ श्रुतिसार शिरोरत्न । चरणांबुज परम पावन । वेदांत—कमलिनी चिद्भानु । तया नमन गुरुवर्या ॥ ३७ ॥ ज्याचे स्मरणमात्रें ज्ञान । साधकां होय उत्पन्न । ते निजसंपत्ति जाण । दिधली संपूर्ण गुरुरायें ॥ ३८ ॥ चैतन्य शाश्वत शांत । नित्य निरंजन अच्युत । नादबिंदु कलातीत । नमन प्रणिपात गुरुवर्या ॥ ३९ ॥ ज्ञानशक्तिसमारूढ । तत्त्वमाला-भूषित दृढ । भुक्तिमुक्तिदाता प्रौढ । सद्गुरु गूढ सुखदानीं ॥ ४० ॥ अनेक जन्मींचें सुकृत । निरहंकृति निर्हेत । तरीच प्रबोध प्राप्त । जरी श्रीगुरुहस्त मस्तकीं ॥ ४१ ॥ जगन्नाथ जगद्गुरु एक । तो माझा स्वामी देशिक । ममात्मा सर्वभूतव्यापक । वैकुंठनायक श्रीगुरु ॥ ४२ ॥ ध्यानमूल गुरुराय । पूजामूल गुरुपाय । मंत्रमूल निःसंशय । मोक्षमूल

तेथें कैचें आत्मज्ञान । गुरुभक्तासी समाधान । पुण्यपावन ऐकतां ॥ ७२ ॥ एवं या भक्तिभावें । श्रवणें पठणें मुक्त व्हावें । ऐसें बोलतां सदाशिवें । डोलती अनुभवें गुरुभक्त ॥७३॥ गुरुगीता हे देवी । शुद्ध तत्त्व पूर्ण पदवी । भवव्याधिविनाशिनी स्वभावी । स्वयमेव देवि जपे सदा ॥७४॥ गुरुगीतेचें अक्षर एक । मंत्रराज हा सम्यक । अन्यत्र मंत्र दुःखदायक । मुख्य नायक हा मंत्र ॥७५॥ अनंत फळें पावविती । गुरुगीता हे पार्वती । सर्वपापविनिर्मुक्ति । दुःखदारिद्र्यनाशिनी ॥७६॥ कालमृत्युभयहर्ती । सर्वसंकट-नाशकर्ती । यक्ष–राक्षसी–प्रेत–भूतीं । निर्भय वृत्ती सर्वदा ॥७७॥ महाव्याधिविनाशिनी । विभूतिसिद्धिदायिनी । अथवा वशीकरण मोहिनी । पुण्यपावनी गुरुगीता ॥७८॥ कुश अथवा दूर्वासन । शुभ्र कंबल समसमान । एकाग्र करूनियां मन । सद्‌गुरुध्यान करावें ॥७९॥ शुक्ल शांत्यर्थ जाण । रक्तासनें वशीकरण । अभिचारी कृष्णवर्ण । पीतवर्ण धनागमीं ॥८०॥ शांत्यर्थ उत्तराभिमुख । वशीकरणा पूर्व देख । दक्षिण मारण उल्लेख । धनागमा मुख पश्चिमे ॥८१॥ मोहन सर्व भूतांसी । बंधमोक्षकर विशेषीं । राजा वश्य निश्चयेंसी । प्रिय देवासी सर्वदा ॥८२॥ स्तंभनकारक जप । गुणविवर्धन निर्विकल्प । दुष्कर्मनाशक अमूप । सुखस्वरूप सनातन ॥८३॥ सर्वशांतिकर विशद । वंध्यापुत्र–फलप्रद । अवैधव्य सौभाग्यप्रद । अगाध बोध जपतां हे ॥ ८४ ॥ आयुष्य आरोग्य ऐश्वर्य । पुत्रपौत्र धैर्यौदार्य । विधवा जपतां परमाश्चर्य । मोक्षैश्वर्य पावती ॥ ८५ ॥ अवैधव्याची कामना । धरितां पूर्ण होय वासना । सर्व दुःखभयविघ्ना । पासोनि सुजना सोडवी ॥ ८६ ॥ सर्वबाधाप्रशमनी प्रत्यक्ष । धर्मार्थकाम-मोक्ष । जें जें चिंतिलें तो पक्ष । गुरुदास दक्ष पावती ॥ ८७ ॥ कामिकां कामधेनु गाय । कल्पिती तया कल्पतरु होय । चिंतिती तया चिंतामणिमय । मंगलमय सर्वांसी ॥ ८८ ॥ गाणपत्य शाक्त सौर । शैव वैष्णव गुरुकिंकर । सिद्धी पावती सत्वर । सत्य सत्य वरानने ॥ ८९ ॥ संसारमलनाशार्थ । भवबंधपाशनिवृत्त । गुरुगीतास्नानें सुस्नात । शुचिर्भूत सर्वदा ॥ ९० ॥ आसनीं शयनीं गमनागमनीं । अश्व गज अथवा यानीं । जागृतीं सुप्तीं स्वप्नीं । पढतां होय ज्ञान गुरुगीतां ॥ ९१ ॥ गुरुगीता पढतां भक्त । सर्वदा तो जीवन्मुक्त । त्याच्या दर्शनें पुनीत । पुनर्जन्म न होत प्राणियां ॥ ९२ ॥ अनेक उदकें समुद्रउदरीं । नानावर्णा धेनू क्षीर क्षीरीं । अभिन्नरूपें निर्धारीं । सर्वांतरीं एकचि ॥ ९३ ॥ घटाकाश मठाकाश । उपादिभेदें भिन्न वेष । महदाकाश निर्विशेष । द्वैताचा लेश नाढळे ॥९४॥ भिन्न भिन्न प्रकृति । कर्मवशें दिसती आकृति । घेऊनि जीवपणाची बुंथी । विविध भासती नामरूपें ॥ ९५ ॥ नाना अलंकारी सुवर्ण । तैसा जीवात्मा पूर्ण । तेथें नाहीं वर्णावर्ण । कार्यकारणातीत तें ॥ ९६ ॥ या स्वानुभवें गुरुभक्त । वर्तती ते जीवन्मुक्त । गुरुरूप ते वेदोक्त । जे कां विरक्त सर्वस्वें ॥ ९७ ॥ अनन्यभावें गुरुगीता । जपतां सर्व सिद्धि तत्त्वतां । मुक्तिदायक जगन्माता । संशय सर्वथा न धरीं तूं ॥ ९८ ॥ सत्य सत्य हें वर्म । मी बोलिलों सर्व धर्म । नाहीं गुरुगीतेसम । तत्त्व परम सद्‌गुरु ॥ ९९ ॥ एक देव एक जप । एक निष्ठा परंतप । सद्‌गुरु परब्रह्मस्वरूप । निर्विकल्प कल्पतरु

॥ १०० ॥ माता धन्य पिता धन्य । याति कुल वंश धन्य । धन्य वसुधा देवी
धन्य । धन्य धन्य गुरुभक्ति ॥ १०१ ॥ गुरुपुत्र अपंडित । जरी मूर्ख तो सुनिश्चित ।
त्याचेनि सर्व कार्यसिद्धि होत । सिद्धांत हा वेदवचनीं ॥ १०२ ॥ शरीर इंद्रियें
प्राण । दारा–पुत्र–कांचन–धन । श्रीगुरुचरणावरून । वोवाळून सांडावे ॥ १०३ ॥
आकल्प जन्म कोडी । एकाग्रमनें जपतां प्रौढी । तपाची हे फळजोडी । गुरुसी
अर्धघडी विमुख नोहे ॥१०४ ब्रह्मादिक देव समर्थ । त्रिभुवनीं वंद्य यथार्थ । गुरुचरणो-
दकावेगळें व्यर्थ । अन्य तीर्थ निरर्थक ॥१०५ सर्व तीर्थांत तीर्थ श्रेष्ठ ! श्रीगुरुचरणांगुष्ठ ।
निवारी संसारकष्ट । पुरवी अभीष्ट इच्छिलें ॥१०६॥ हें रहस्यवाक्य तुजपुढें । म्यां
कथिलें निजनिवाडें । माझेनि निजतत्त्व गौप्य उघडें । करूनि वाडेंकोडें दाखविलें ॥१०७॥
मुख्य गणेशादि वैष्णव । यक्ष–किन्नर–गणगंधर्व । तयांसहि सर्वथैव । हें अपूर्व न वदें
मी १०८ अभक्त वंचक धूर्त । पाषांडी नास्तिक दुर्वृत्त । तयांसी बोलणें अनुचित ।
हा गुह्यार्थ पैं माझा ॥१०९॥ सर्व शास्त्रांचें मथित । सर्ववेदांतसंमत । सर्व स्तोत्रांचा
सिद्धांत । मूर्तिमंत गुरुगीता ॥११०॥ सकल भुवनें सृष्टि । पाहतां व्यष्टि समष्टि ।
मोक्षमार्ग हा दृष्टी । चरणांगुष्ठीं सद्गुरुच्या ॥१११॥ उत्तरखंडीं स्कंदपुराणीं । ईश्वर-
पार्वतीसंवाद वाणी । गुरुगीता ऐकतां श्रवणीं । विश्वतारिणी चिद्गंगा ॥११२॥ हे गुरुगीता
नित्य पढे । तया सांकडें कवण पडे । तत्काळ मोक्षद्वार उघडे । ऐक्य घडे शिवस्वरूपीं ॥११३॥
हे न म्हणावी प्राकृत वाणी । केवळ स्वात्मसुखाची खाणी । सर्व पुरवी शिराणी । जैसा वासर-
मणि तम नाशी ॥११४॥ श्रोतयां वक्तयां विद्वजनां । अनन्य भावें विज्ञापना । न्यूनपूर्ण
नाणितां मना । क्षमा दीनावरी कीजे ॥११५॥ हे गुरुगीतेची टीका । न म्हणावी जे पुण्य
श्लोका । पदपदार्थ पाहतां निका । दृष्टी साधकां दिसेना ॥११६॥ आवडीची जाती
वेडी । वाचे आलें तें बडबडी । मूळ ग्रंथ कडोविकडी । न पाहतां तातडी म्या
केली ॥११७॥ नाहीं व्याकरणीं अभिनिवेश । नाहीं संस्कृती प्रवेश । धीटपणें लिहितां
दोष । गमला विशेष मनातें ॥११८॥ परी सलगी केली पायांसवें । तें पंडितजनीं
उपसहावें । उपेक्षा न करूनि सर्वभावें । अवधान द्यावें दयाळुत्वें ॥११९॥ विकृतिनाम
संवत्सरीं । भाद्रपदमासीं भृगुवासरीं । वद्य चतुर्थी नीरातीरीं । ग्रंथ केला समाप्त ॥१२०॥
आनंदसांप्रदाय वंशोद्भव । माध्यंदिनशाखा अभिनव । गुरुगीतेचा अनुभव । हृदयीं
स्वयमेव प्रगटला ॥१२१॥ सहजपूर्ण निजानंदें । रंगला तो साधुवृंदें । श्रवण करावा
स्वच्छंदें । ग्रंथ निर्द्वंद्व गुरुगीता ॥१२२॥ इति श्रीगुरुगीता संपूर्णा । श्रीसद्गुरुनिजानंदा-
र्पणमस्तु ॥ शुभं भवतु । श्रीरस्तु । ॐ तत्सत् । श्रीगुरुदेव दत्त ॥

# गुरुमहिमा व गुरुसेवा

लेखक : वि. पां. सातपुते

भारतीय जीवनांत गुरुसेवेचें महात्म्य अपरंपार आहे. खऱ्या-खुऱ्या ज्ञानाचीं अर्थात् ब्रह्मज्ञानाचीं कवाडें गुरुकिल्लीशिवाय उघडलीं जात नाहींत. देव असो वा मानव असो; गुरुकृपेशिवाय त्याचा तरणोपाय नाहीं. प्राचीन काळापासून आजच्या काळापर्यंत गुरुमाऊलीचें महत्व कसकसें मानलें जात असे, याचा आढावा श्री. वि. पां. सातपुते यानीं या लेखांत घेतला आहे.

—संपादक

भारतीय तत्त्वज्ञानाच्या परंपरेंत गुरुमहात्म्य व गुरुसेवा यांस असाधारण श्रेष्ठ स्थान दिलें गेलें आहे व तें यथायोग्यच आहे. आपले वैदिक वाङ्मय अति प्राचीन आहे. वेद अपौरुषेय आहेत असें म्हटलें जातें. या वाङ्मयनिर्मितीच्यावेळीं लेखन-कलाही कदाचित् अस्तित्वांत नसावी. 'वाङ्मय' या शब्दाच्या विग्रहावरून या म्हणण्यास पुष्टि मिळते. वाक् म्ह. वाणी किंवा बोलणें. म्हणजे जें व्याख्यान व श्रवण या माध्यमांच्याद्वारें परंपरेनें जतन व जोपासित केलें गेलें तें वाङ्मय. लिपिपूर्वकालीं अध्ययन अध्यापनाचा गुरु-शिष्यपरंपरा हा एकमेव उपाय असल्यामुळें 'गुरु' या संस्थेस मानाचें वरचें स्थान मिळणें स्वाभाविक आहे. 'श्रुति' (ऐकणें) 'स्मृति' (लक्षांत ठेवणें) 'उपनिषद्' (जवळ बसणें) या शब्दांवरूनही हीच गोष्ट सुचित होते.

## व्यास महर्षींचा सल्ला

श्रीमद्भागवतकार विरक्तशिरोमणि शुकयोगींद्र स्त्रीदेह स्पर्शाच्या भीतीनें बारा वर्षें मातेच्या उदरांतून बाहेर आले नाहींत, व नंतर येतांक्षणींच तशाच दिगंबरावस्थेंत मागें वळूनही न पाहातां तपश्चर्येस निघाले. त्यांचे पिताश्री महर्षि व्यास यांनीं पुत्र-हिताच्या कळवळ्यानें "जातांना जनक राजास भेटून जा" असें श्रीशुकांस सांगितलें. त्याप्रमाणें श्रीशुक व जनकराजा यांच्या भेटीमुळें दिगंबर शुकांचा "मी" रूप अहंकाराचा परिग्रह नाहींसा झाला, म्हणजेच श्रीशुकांस जनकराजा गुरुस्थानीं झाला.

## श्रीकृष्णाचें भूषण

मातेच्या उदरांत असल्या वेळेपासूनच ज्यांच्या दिव्य अवतार कृत्यांस आरंभ झाला व म्हणून ज्यांना पूर्णावतार म्हणतात, त्या भगवान श्रीकृष्णांनींही परंपरारक्षणार्थ

व लोकसंग्रहासाठीं, जेष्ठबंधु बळराम व मित्र सुदामा यासमवेत कांहीं काळ सांदीपनी ऋषींच्या आश्रमीं वास करून सर्वप्रकारें सेवा करून ज्ञानप्राप्ति करून घेतली. ' वर्णानां ब्राह्मणो गुरु.' या वचनाची सत्यता संभाळण्यासाठीं श्रीकृष्णांनीं भृगुऋषींचा लत्ताप्रहार वक्षःस्थलावर सहन केला, इतकेंच नव्हे, तर ती पावलांची खूण 'श्रीवत्सलांचन' एक भूषण म्हणून कायमची धारण केली. या संदर्भात ज्ञानेश्वरीतील पुढील ओंव्या उल्लेखनीय आहेत. 'मियां लक्ष्मी डावलोनि केली परौती। फेडूनि कौस्तुभ घेतला हातीं। मग वोढवली वक्षःस्थळाची वाखती। चरण रजा ॥ अझुनी पाउलांची मुद्रा। मी हृदयीं वाहे गा सुभद्रा। जे आपुलिया दैवसमुद्रा। जनतेलागीं ॥ (ज्ञा. ९।४८०–८१)

## अवधूताचे चौवीस गुरु

श्रीमद्भागवत एकादशस्कंदांत सातव्या अध्यायांत अवधूतानें केलेल्या चौवीस गुरुंचें वर्णन आहे. त्यांची यादी त्या अध्यायाच्या ३३ व ३४ श्लोकांत आहे व त्यांचें कमी अधिक विस्तृत वर्णन पुढें अध्याय समाप्तीपर्यंत (श्लोक ७३।७४) आहे. एकनाथ महाराजानीं अत्यंत रसाळ दृष्टांत रूपकयुक्त ओवीबद्ध व्याख्यान केलें आहे. त्याचा विस्तार सुमारें ३२९ ओंव्यांचा आहे. (ए. भा. ७–३१९।६४९) यांत ' गुरु ' या पदाचा अर्थ व्यापक दृष्टीनें आहे हें पुढील दोनच ओंव्यावरून स्पष्ट होतें. जो जो जयाचा घेतला गुण। तो तो म्यां गुरु केला जाण। गुरुंसि आलें अपारपण। जग संपूर्ण गुरु दिसे ॥ ज्याचा गुण घेतला। तो सहजें गुरुत्वा आला। ज्याचा गुण त्यागरूपें घेतला। तोही गुरु झाला अहितत्यागें ॥ (ए. भा. ७। ३४०–३४१)

## श्री शंकराचार्यांची कामगिरी

त्याच काळीं झपाट्यानें प्रचार होत असलेल्या व बहुजनसमाज अनुयायी होत असलेल्या बौद्ध व जैन धर्मांच्या प्रसारास ज्यांनीं परिणामकारक रीतीनें, आपल्या गाढ विद्वत्तेनें, तर्कशुद्ध वादविवाद पद्धतीनें व प्रतिपक्षास निरुत्तर करून, आळा घातला व मागें पडत चाललेल्या वैदिक धर्माचें ज्यांनीं पुनरुज्जीवन व पुनरुध्थापन केलें व लोकमतास पुनः ज्यांनीं वैदिक धर्माकडे खेंचलें त्या आद्य श्रीशंकराचार्यांनीही आपल्या शतश्लोकी या वेदांत ग्रंथांत पहिल्याच " दृष्टांतो नैव दृष्टः ० " या श्लोकांत गुरुंची महती वर्णन करतांना सद्गुरुंना देण्यासारखा एकही दृष्टांत त्रिभुवनांत पाहिला नाहीं. कदाचित गुरुंना परिसाची उपमा द्यावी तर ती अपुरी पडते. कारण परिसानें लोखंडाला स्पर्श केला तर लोखंडाचें सोनें होतें. लोखंडास परिसपणा देण्याचें सामर्थ्य परिसांत नाहीं. दुसऱ्यापक्षीं, सद्गुरु आपल्या कृपाप्रसादानें शिष्यास आपल्या पदास नेतात, असें म्हटलें आहे. ' शिष्यादिच्छेत् पराजयम ! " शिष्याकडून आपला पराजय व्हावा, म्हणजेच आपला शिष्य आपल्यापेक्षां जास्त ज्ञानी व्हावा, अशी खऱ्या सद्गुरूची तळमळ दर्शविणारी वरील संस्कृत उक्ति सुपरीचित आहे.

## नामदेवांची गुरुमाऊली

आमच्या महाराष्ट्रीय संतांनींसुद्धां गुरुमाहात्म्यास व गुरु सेवेस आगळें स्थान दिलें आहे. अशी एकही संतवाङ्मय निर्मिति नाहीं कीं ज्यांत गुरूंची श्रद्धायुक्त स्तुति केली नाहीं व त्यांचें ऋण कबूल केलें नाहीं, असें म्हणण्यांत सत्याचा थोडाही अपलाप होणार नाहीं. गुरुपदेशाखेरीज आत्मज्ञानप्राप्ति नाहीं हें प्रत्यक्ष भगवंतांसही अभिप्रेत आहे. भक्त नामदेव विठ्ठलाचे इतके लाडके कीं त्यांनीं नामदेवाच्या ताटीं जेवावें व एकमेकांनीं घांस द्यावेत, पण या सगुणभक्तश्रेष्ठास निर्गुणाचें ज्ञान व्हावें अशी भगवंतांस तळमळ असल्यामुळें त्यांनीं नामदेवांस विसोबा खेचर यांचा उपदेश घेण्याचा आदेश दिला.

## ज्ञानेश्वरीचा आत्मा

गुरुनिष्ठा व गुरुसेवा हा ज्ञानेश्वर व ज्ञानेश्वरी यांचा आत्माच आहे. जसें रामावांचून रामायण व्यर्थ, तसेंच गुरुभक्तिपर वर्णनावाचून ज्ञानेश्वरीच्या साहित्य सौंदर्यांत उणीव निर्माण होईल असें सार्थपणें म्हणतां येईल. अध्यायाच्या उपक्रमाच्या प्रसंगानें, विषयाच्या व्याख्यानांत ओघानें आल्यामुळें प्रासंगिक, व प्रत्यक्ष पदाचें व्याख्यान अशा प्रकारांनीं ज्ञानेश्वरींत अंतर्भूत अशा गुरुस्तवनविषयक ओंव्यांची संख्या सुमारें ५०० इतकी भरेल. तेराव्या अध्यायांतील ज्ञानलक्षणांतील "आचार्योपास्ति" या पदावर ज्ञानेश्वरांचें ९० ओव्यांचें व्याख्यान आहे. "ज्ञानेश्वरींतील गुरुस्तवन व गुरुसेवावर्णन" हा अशा प्रकारच्या धांवत्या समालोचनाचा विषय नाहीं. त्याचा विचार स्वतंत्रपणेंच करावयास हवा.

## गुरुजनांचा आदर

गुरु शब्दाचा अर्थ जसा ज्ञानदाता असा आहे, तसाच तो वडीलधारी माणसें असाहि आहे. या दुसऱ्या पर्यायास साधारणपणें गुरुजन असें म्हटलें जातें. ज्याप्रमाणें ज्ञानदाते गुरु त्याचप्रमाणें जन्मदाते मातापिता हेंही गुरुस्थानींच आहेत, म्हणून ब्रह्मचाऱ्यास शिक्षा सांगतांना, मातृदेवो भव। पितृदेवो भव। आचार्यदेवो भव। इ. असा उपदेश केला जातो. व्रतबंध विधि सांगण्यास व संध्येचा पाठ देण्यास जरी कुलोपाध्याय असले तरी गायत्री मंत्राच्या उपदेशासाठीं पिताच आपल्या मुलाचा प्रथम गुरु होऊन त्याच्या कानांत मंत्रोच्चार करतो. श्रावणीच्यावेळीं तर्पणांतहि जर विशिष्ट गुरु कोणी असतील तर दिवंगत पित्याच्याच नांवाचा व गोत्र प्रवरांचा उच्चार करून तर्पण करण्याची पद्धत आहे. यावरून स्वतःचे वडील हेही गुरुस्थानींच आहेत, हें दिसून येईल.

पारमार्थिक व आत्मज्ञान ज्यांच्यापासून प्राप्त होतें त्यांस 'सद्‌गुरु' म्हणतात. भौतिक, व्यवहारिक, चरितार्थ विषयक ज्ञानें ज्यांच्याकडून मिळतात त्यांना 'गुरु' म्हणतात. म्हणून गुरु जरी अनेक असले तरी सद्‌गुरु एकच असूं शकतात, हें ओघानें येतें.

## गुरुसेवा व ज्ञानप्राप्ति

भगवद्‌गीतेच्या चौथ्या अध्यायांत 'तद्विद्धि प्रणिपातेन परिप्रश्नेन सेवया। उपदे-

क्ष्यंति ते ज्ञानं ज्ञानिनस्तत्त्वदर्शिनः ॥ असा ३४ वा श्लोक आहे व त्यावर ज्ञानेश्वरांची टीका अशी आहे : तें ज्ञान पै बरवें । जरी मनीं आथि आणावें । तरी संतां या भजावें । सर्वस्वेंसी ॥ जे ज्ञानाचा कुरुठा । तेथ **सेवा** हा दारवंठा । तो स्वाधीन करी सुभटा । **वोळगोनी** ॥ तरी तनुमनजीवें । **चरणांसी लागावें** । आणि अगर्वता करावें । **दास्य** सकल ॥ मग अपेक्षित जें आपुलें । तेंही सांगतील **पुसिलें** । जेणें अंतःकरण बोधलें । संकल्पा न ये ॥ ( ज्ञा. ४–१६५।१६८ ). मूळ श्लोकामध्यें (१) प्रणिपात-नमन, नम्रपणा (२) परिप्रश्न, प्रश्न विचारणें व (३) सेवा अशी गुरूंपासून ज्ञान-प्राप्तीचीं साधनें सांगितलीं आहेत. वरील ओव्यांतील जाड्या टाईपांतील शब्द वरील तीन अर्थांचे द्योतक आहेत.

**गुरुसेवेचें महत्त्व**

साधारण गेल्या शतकाच्या अखेरीपर्यंत गुरुगृहीं वास्तव्य करून, एकनिष्ठेनें गुरुसेवा करून इष्ट ज्ञानप्राप्ति करून घेण्याची प्रथा बरीचशी रूढ होती. त्यावेळीं ‘ वर्गपद्धति ’ आजच्यासारखी प्रगत नव्हती. तेव्हां आपणास साध्य करून घेण्याच्या विद्येच्या व कलेच्या प्राप्तीसाठीं गुरूंची सेवा करून त्यांस प्रसन्न राखणें यास फार महत्त्व असे. विशेषतः संगीत कलेच्या बाबतींत असा प्रकार आपल्या ऐकण्यांत वा वाचण्यांत आला असेल. आजच्या अनेक ख्यातनाम उस्तादांनीं आपल्या गुरुजींकडून ज्या दुर्मिळ चिजा प्राप्त करून घेतल्या, त्यासाठीं त्यांनीं केलेल्या तपश्चर्येची यथार्थ कल्पना इतरे-जनांस येणें कठीण. कोणती चीज कोणत्या वेळेस आळविण्याची गुरुजींस लहर येईल याचा नेम नाहीं. कांहीं विचारण्याची सोय नाहीं न जाणो गुरुजींची तब्येत खफा होऊन तंबोऱ्याची भोपळी डोक्यावर फुटण्याचा संभव, पाहिजे असलेली चीज केव्हां मिळेल यास कालबंधन नाहीं. तेव्हां दिवसाच्या अगर रात्रीच्या कोणत्याहि वेळीं, महिन्यांतील कोणत्याहि दिवशीं, वर्षांतील कोणत्याहि महिन्यांत गुरुजींची लहर लागली कीं तंबोऱ्यास बसणें अशी खडतर गुरुसेवा करून आजच्या उस्तादांनीं कला साध्य करून घेतली आहे. परंतु हें यथार्थ, जावें ज्याच्या वंशा तेव्हां कळे. संगिताची बाजू ही बहुजन समाजाच्या परिचयाची व मनोरंजनाची आहे म्हणून तिचें जरा विस्तारानें वर्णन केलें. इतर क्षेत्रांतहि थोड्या फार तपशीलाच्या फरकानें असेंच आहे हें तज्ज्ञांस अनुभवास येत असेल.

ज्याप्रमाणें ज्ञानार्जनाची आजची साधनत्रयी पाठ्य पुस्तकांच्या अनुषंगानें ( १ ) Buy ( विकत घ्या ) ( २ ) Borrow ( उसनीं घ्या ) किंवा Steae ( चोरी करा ) विनोदानें म्हटली जाते; त्याचप्रमाणें गीताकालीं प्रणिपात, परिप्रश्न व सेवा ही साक्षात् ज्ञान प्राप्तीची अन्वर्थानें त्रयीं होती, व उपयोग करून घेतल्यास आतांही आहे.

**आणि आतां आज—**

प्राचीन ज्ञानदानपद्धति व आजची ज्ञानदानपद्धति यांची तुलनाच होऊं शकत नाहीं. तुलना करायचीच झाली तर ती विरोघात्मक, म्हणजे प्राचीन पद्धति

# ना. बाळासाहेब सावंत यांचा शिरडी येथें सत्कार

नवीन महाराष्ट्र सरकारचे शेतकी मंत्री तसेंच श्रीसाईबाबा संस्थानचे विश्वस्त नामदार पी. के. ऊर्फ बाळासाहेब सावंत यांचा एक भव्य सत्कारसमारंभ ता. २६ मे ६० रोजीं सकाळीं शिरडी येथें शिरडी संस्थान व ग्रामपंचायततर्फे श्री. बाजीराव तात्याजी कोते पाटील यांच्या अध्यक्षतेखालीं यशस्वीरीतीनें पार पाडला. त्यावेळीं शिरडी येथील व आसपासच्या भागांतील मंडळी फार मोठ्या प्रमाणांत हजर होती.

आरंभीं श्री. मराठेरचित स्वागतपर पद्यगायन झालें. त्यानंतर आपल्या अध्यक्षीय भाषणांत श्री. बाजीराव कोते पाटील हे ना. बाळासाहेबांचें सर्वांतर्फे स्वागत करून म्हणाले, 'आपला परिचय सर्वांना आहेच. परंतु श्रीसाईबाबांच्या कृपेमुळें आमच्या नगर जिल्ह्यास आपला जवळून परिचय होण्याची संधि लाभली आहे. शिरडी येथील श्रीसाईबाबांची समाधि हें एक पवित्र व आदरणीय स्थान आहे. हें आमच्या जिल्ह्याचें एक भूषण आहे. अशा या संस्थानचे आपण विश्वस्त व अध्यक्ष असल्यामुळें त्याबद्दल आम्हांला भूषण वाटतें. या संस्थानची आपल्याकडून जी सेवा घडली, तिचेंच फळ मंत्रिपदाच्या रूपानें आपणास मिळालें, असें आम्ही मानतों.

'आपण विविध कार्यक्षेत्रांत बहुमानानें चमकत आहांत. देशकार्यापुढें आपण स्वतःच्या सुखाची व संसाराची केव्हांही पर्वा केली नाहीं. स्वातंत्र्य आंदोलनांत आपण कारावास पत्करला. आजवर भेदभाव न बाळगतां सर्वांसाठीं निरपेक्ष वृत्तीनें आपण

---

जेंवढी ग्राह्य होती तितकी आजची टाकाऊ आहे अशाच प्रकारें करावी लागेल. आमच्या शिक्षणपद्धतीवर पाश्चिमेची छाप असल्यामुळें गुरु ऋण कबूल न करणें, गुरुबद्दल अनास्था, उपेक्षा व अनादर यांचा एक प्रकारें वारसा आमच्याकडे आला आहे. अध्यापन व अध्ययन दोन्हीही चित्तहीन. ज्ञानार्जनाची कळकळ मुळांत नाहीं. मराठी पहिलीपासून अत्युच्च पदवीपरिक्षेंत बहुसंख्य पाठ्य-पुस्तकांचे मार्गदर्शक वाटाडे, गाइड्स उपलब्ध; त्यामुळें तांत्रिक यश मिळविण्याची सवंगता झाली आहे. सर्वांचें लक्ष ' पास ' होण्यावर. मग कमीतकमी कां गुण मिळेनात आमच्याकडे पहिल्या वर्गात उत्तीर्ण होण्यासाठीं ६० टक्के अगर अधिक गुणांची आवश्यकता असते. अमेरिकेंत तृतीय वर्गाच्या यशाचें मान ७० टक्के गुण मिळविण्याचें आहे. हीं तफावत उद्‌बोधक आहे. ही तुलना करणें म्हणजे कोळसा उगाळणें आहे. तो जितका उगाळावा तितका काळाच म्हणून या बाजूनें जास्त खोलांत न जाणेंच उत्तम.

— —

झटलां. आपण सर्वांशीं प्रेमभावानें वागत असल्यामुळें आपला स्नेही, मित्रपरिवार फार मोठा आहे.

'भारतांतील बहुसंख्य लोकांचें जीवन शेतीवर अवलंबून आहे. शेतीचा धंदा हा आतां केवळ कष्टाचा राहिला नसून त्याला ज्ञानाचीही जोड झाली पाहिजे. त्या दृष्टीनें महाराष्ट्रीय शेतकऱ्यांची धडपड चालू आहे. पाटबंधारे वाढविले पाहिजेत व त्या वाढीला या जिल्ह्यांत अजूनही वाव आहे. आमच्या शेतीविषयक अडचणी नानाविध आहेत. त्या दूर होणें इष्ट आहे. या अडचणी समजून घेऊन त्या दूर करण्यासाठीं आपण झटाल व नगर जिल्ह्यांतीलच नव्हे तर महाराष्ट्रांतील शेतकऱ्यांच्या जीवनांत समृद्धीचें मंगल वातावरण आणण्यासाठीं झटाल अशी आशा आहे. शेतकी मंत्रीपद आपणास लाभल्यामुळें ती संधी आपणास मिळणार आहे हें आम्हीं आमचें भाग्य समजतों.'

त्यानंतर शिरडी ग्रामपंचायतीचे सरपंच रा. सा. तात्याजी गोंदकर पाटील यांनीं ना. बाळासाहेब पाटील यांस अर्पण करावयाचें मानपत्र वाचून दाखविलें.

या मानपत्रांत ना. बाळासाहेब सावंत यांच्या एकंदर यशस्वी जीवनकार्याचा थोडक्यांत परिचय करुन देऊन शिरडी गांवाच्या सुधारणेसंबंधीं चालू असलेल्या कार्याचा व यापुढील काळांत ज्या सुधारणा हातीं घेण्यांत येतील त्यांत जरूर तें सरकारी सहकार्य मिळत जावें, अशी अपेक्षा प्रकट करण्यांत आली आहे. शेवटीं म्हटलें आहे कीं, 'आपण निरनिराळ्या क्षेत्रांत कार्य करीत आहांत. तशात शेतकी मंत्री या नात्यानें आपल्यावर फार मोठी जबाबदारी येऊन पडली आहे. यामुळें आपल्या मागें कार्याचा फार मोठा व्याप असतांना सुद्धां वेळांत वेळ काढून शिरडी ग्रामपंचायतीस भेट दिली, त्याबद्दल ग्रामपंचायत आपले मनःपूर्वक आभार मानते. व आपल्या अंगीकृत जनसेवेंत आमचा सदैव पाठींबा राहील असें आम्हीं आश्वासन देतों व आपले कार्यास सुयश चिंतून आपणास अधिकाधीक जनतेची सेवा करण्यासाठीं जें हें मंत्रीपद मिळाले आहे तें यशस्वी रित्या पार पाडण्यासाठीं श्री साईबाबाजवळ आपणांस शक्ती, बुद्धी व दिर्घा-युरारोग्य मिळो, अशी प्रार्थना करून हे मानपत्र सादर करतों.

ना. बाळासाहेब सावंत यांनीं या स्वागत व मानपत्र समारंभाबद्दल आभार मानून सर्वांच्या अपेक्षेप्रमाणें आपल्या हातून जें जें शक्य असेल तें करण्यांत आपल्याकडून केव्हांहि कसूर होणार नाहीं, असें प्रेमपूर्वक आश्वासन दिल्यानंतर आभारप्रदर्शन वगैरे कार्यक्रम होऊन, हा संस्मरणीय समारंभ आटोपला. दुपारीं कमिटी हॉलमध्यें भोजन होऊन माननीय ना. बाळासाहेब हे संगमनेरकडे रवाना झाले.

---

# श्रीसाईसच्चरित – गद्यानुवाद

ले० : एक साईभक्त



## अध्याय पांचवा

श्रीगणेशास, सरस्वतीस, गुरुस, कुलदेवतेस, सीतारामचंद्रास, सद्गुरु साईनाथास नमस्कार. आतां पूर्वीच्या कथेच्या अनुसंधानें बाबा शिरडींतून गुप्त होऊन चांद पाटलाबरोबर परत शिरडींत आले ही हकिगत ऐका. बाबांनीं स्वतः पाणी वाहून बाग कशी निर्माण केली, गंगागिरादि संतांचा मेळावा इत्यादि कथा पवित्र आहेत. कांहीं काळ बाबा गुप्त झाले होते. नंतर मुसलमानाचे वऱ्हाडांत ते पुन्हां शिरडींत आढळले. त्याआधीं देवीदास शिरडींत राहात होते. पुढें जानकीदास गोसावी शिरडीस आले. तो प्रकार कसा घडला तें मी आतां सविस्तर कथन करीत आहे. आपण लक्ष देऊन ऐकावें.

औरंगाबाद जिल्ह्यांतील धूप नांवाच्या खेडेगांवांत चांद पाटील नावाचे भाग्य-शाली मुसलमान गृहस्थ रहात होते. एकदां ते औरंगाबादेस गेले असतां त्यांची घोडी हरवली. दोन महिने त्यांना तिची दाद लागली नाहीं. आतां ती कसली मिळते, म्हणून पाटील पूर्ण निराश झाले. घोडीसाठीं ते फार हळहळले. अखेर खोगीर पाठीवर मारलें आणि पायींच ते माघारीं गांवाकडे परतले. औरंगाबाद मागें टाकलें. रानांतून चार साडेचार कोस मार्ग तुडवित ते आले. वाटेंत एक मोठें आंब्याचें झाड लागलें. त्याच्या खालीं बसलेले साईबाबा पाटलांना दिसले. त्यांच्या अंगात पायघोळ कफनी असून डोक्यास टोपी होती आणि हातांत सटका होता. तंबाखू चुरून त्यांनीं चिलीम भरलेली होती व ते ती ओढण्याच्या बेतांत होते; तोंच नवल वर्तलें. चांद पाटील रस्त्यानें जात होते. फकिरानें त्यांना हांका मारून बोलाविलें आणि म्हटलें, "अरे, या झाडाच्या छायेखालीं जरा बैस चिलीम पी आणि पुढें मार्गाला लाग. अरर्, हें खोगीर कशाला रे ?" पाटील उत्तरले, "अहो, माझें घोडें हरवलंय !" बाबांनीं त्याला जवळच असलेल्या नाल्यांत तपास करण्यास सांगितलें. पाटलांनीं तसें करतांच त्यांना त्यांची घोडी सांपडली. चांदपाटील फार विस्मय चकीत झाले आणि मनांत म्हणाले कीं, आज आपल्याला अवलीया भेटला याची करणी अगाध आहे. याला माणूस म्हणतां येणार नाही. ते घोडी घेऊन परत झाडाखालीं आले. फकीरानें त्यांना जवळ बसवून घेतलें. त्यानें आपला चिमटा जमिनींत खुपसून आंतून जळता निखारा

काढला आणि हातांतील चिल्मीवर ठेविला. चिल्मीची छापी भिजवावास जवळपास पाणी नाहीं म्हणून त्यानें आपला सटका जोरानें जमिनीवर आपटला. त्याबरोबर जमिनींतून पाणी निघूं लागलें. त्या पाण्यानें त्यानें छापी भिजवून पिळली आणि चिल्मीभोंवतीं गुंडाळली. मग त्यानें चिलीम ओढली आणि पाटलांनाहि पाजली. चांद पाटील हें पाहून मतिगुंग झाले! पाटलांनीं फकीरास त्याच्या घरीं येऊन तें पवित्र करण्याचा फारच आग्रह केला. लीलाधारी बाबांनीं त्याच्यावर अनुग्रह केला. दुसरे दिवशीं ते गांवांत गेले. व पाटलाच्या येथें उतरले. कांहीं काळ ते तेथें राहिले व पुढें शिरडीस परतले.

हा चांद पाटील धूप खेड्याचा ग्रामाधिकारी होता. त्याच्या बिबीच्या भाच्याची शिरडींतील मुलीशीं सोयरीक झाली होती. भाचा लग्नाला योग्य झाला होता. लग्न शिरडींतच करण्याचें ठरलें. चांद पाटील गाड्याघोड्यांतून सर्व वऱ्हाड घेऊन शिरडीस निघाले. चांदभाईवरच्या प्रेमामुळें बाबाही त्या वऱ्हाडांत सामील झाले.

लग्न झालें. वऱ्हाड परत गेलें. पण बाबा मागें राहिले ते मागेंच राहून गेले. त्यामुळें शिरडीचें भाग्य मात्र उदयास आलें. साईबाबा अतिशय पुराणपुरुष असून अविनाशी आहेत. ते ना हिंदु ना यवन. त्यांना जात नाहीं पात नाहीं. ते कुळ आणि गोत कांहीं जाणत नाहींत.

'साई, साई' असें लोक म्हणतात तें नामाभिधान पडलें तरी कसें? बहुमानार्थ 'या साई' म्हणून त्यांना संबोधलें गेलें. तेंच नांव पुढें त्यांना पडलें. खंडोबाच्या देवाजवळ म्हाळसापतीच्या खळ्यांत ज्या दिवशीं बाबा चांदपाटलाच्या वऱ्हाडाबरोबर उतरले त्याच दिवशीं हें नांव पडलें. आरंभीं हें खळें म्हाळसापति भगताचें होतें. पुढें तें अमीनभाईचें झालें. लग्नाचें वऱ्हाड आलें तें येथेंच. वडाखालीं उतरलें होतें. खंडोबाच्या पटांगणांत आणि खळ्यांत सर्व गाड्या सुटल्या. वऱ्हाडांतील सगळ्या मंडळीबरोबर बाबाही येथें उतरले. हे बालफकीर गाडींतून उतरले ते प्रथम भगताचे दृष्टीस पडले. 'या साई' म्हणून भगत सामोरे गेले. तेथूनच तें नांव बाबांना पडलें. नंतर सर्व लोक 'साई साई' म्हणून त्यांना हांक मारू लागले. तेंच नांव पुढें कायम झालें.

मग ते तेथें चिलीम प्याले. मशीदींत राहिले आणि देवीदासाच्या संगतींत रमले. शिरडींत त्यांना आनंद वाटूं लागला. तें कधीं चावडींत बसत तर कधीं देवीदासाबरोबर असत. कधीं कधीं मारुतीचे देवालयांत वास्तव्य करीत व स्वच्छंदानें वागत.

हे देवीदास बाबांच्यापूर्वीपासूनच शिरडींत होते. पुढें महानुभावी जानकीदास गोसावी तेथें राहवयास आले. जानकीदासाबरोबर महाराजांनीं बोलत बसावें किंवा महाराज असतील तेथें जानकीदासांनीं जाऊन बसावें, असा परीपाठ होता. उभयतांचें एकमेकां-बद्दल मोठें प्रेम. वारंवार त्यांच्या बैठकी होत. त्यांची ही संगत सर्वांना सुखदायक असे

तसेंच गंगागीर नांवाचे पुणतांब्याचे महाप्रसिद्ध वैष्णव भक्त होते. हे गृहस्थाश्रमी होते. त्यांचेंही वारंवार शिरडीस आगमन होई. आरंभीं साई विहिरीवरून दोन्हीं हातांत पाण्यानें भरलेल्या मातीच्या घागरी वाहत असत. हें पाहून गंगागिरांना मनांतून आश्चर्य वाटत असें. त्यांनीं साईंनां पाहून म्हटलें कीं, शिरडीचें भाग्य फार मोठें म्हणूनच त्यांच्यासारखें हें रत्न येथें अवतरलें आहे. आज हे खांद्यावरून पाणी वाहतांना जरी दिसले तरी ही मूर्ती सामान्य नाहीं. या शिरडी गांवची तशीच पुण्याई म्हणून हे येथें आले आहेत. आणखी एक आनंदनाथ नांवाचे प्रसिद्ध संत होते. त्यांनीं सुद्धां असेंच भाकीत केलें कीं, साई येथें अद्‌भुत कार्य करतील. आनंदनाथ येवल्यास मठ स्थापून राहिले होते. एकदा कांहीं शिरडीकरांबरोबर ते शिरडीस आले होते. अक्कलकोट महाराजांचे ते शिष्य. साईंना पाहतांच ते म्हणाले, अहो ! हा प्रत्यक्ष हिरा आहे ! आज जरी उकिरड्यावर पडलेला असला तरी तो हिरा आहे. गारगोटी नाहीं ! बाबांचे पोरवय होतें अगदीं. ध्यानांत ठेवा माझे हे बोल. पुढें आठवण होईल तुम्हांला याची.' असें बोलून ते मग येवल्यास परत गेले.

तरुण वयांत साई मुंडन न करितां सर्व डोक्यावर केस ठेवून पेहलवानासारखा पेहराव करीत. राहत्यास जात तेव्हां तेथून जाई, जुई झेंडूचीं वगैरे फुलझाडें आणून गांवांतल्या उजाड जागेंत ते लावीत. त्यांचा भक्त वामनतात्या त्यांना दररोज दोन कच्चे घडे पुरवीत असे. आडावरच्या कुंडींतून स्वतःच्या खांद्यावरून पाणी आणून बागेची शिंपणी करीत. संध्याकाळ झाली म्हणजे ते घडे निंबाच्या तळीं नेऊन ठेवीत आणि असें करण्याचा अवकाश कीं ते घडे ताबडतोब दुभंगून जात. भाजलेलें मडकें ते केव्हांहि पसंत करीत नसत. कच्चा कोरा घडा त्यांना लागत असे. आव्यांत भाजण्यापूर्वीच मडक्याचा विक्रा होत असे. सतत तीन वर्षें हा उद्योग बाबांनीं केला आणि उघड्या जागेवर एक सुंदर बाग उठविली. आज याच स्थानावर वाडा बांधण्याचा सुयोग आला असून भक्तजन त्याचा उपभोग घेत आहेत.

तेथेंच निंबातळीं भाई नांवाच्या एका भक्तानें पूजेच्छूकरितां अक्कलकोटस्वामींच्या पादुका स्थापन केल्या. अक्कलकोटचे स्वामीसमर्थ भाईचें उपास्य दैवत होते. त्यांच्या प्रतिमेची पूजाअर्चा भाई निष्ठेनें करीत असत. अक्कलकोटला जाऊन पादुकांचें दर्शन घ्यावें, मनोभावें पूजा करावी असें एकदा त्यांना वाटलें मुंबईहून निघण्याची सर्व तयारी केली. उद्यां निघायचें तो बेत तसाच राहून त्यांनीं शिरडीची वाट धरिली. निघण्याच्या आदल्या दिवशी भाईंच्या स्वप्नांत येऊन ' मी सध्यां शिरडीस आहे. करितां तेथें तूं प्रस्थान कर ' अशी स्वामी समर्थांनीं त्यांना आज्ञा केली. तीच आज्ञा शिरसावंद्य मानून भाई शिरडीस येऊन सहा महिने राहिले आणि आनंदसंपन्न झाले. भाई पूर्ण निष्ठावंत भक्त होते. स्वप्न दृष्टांत स्मरणांत राहावा म्हणून त्यांनीं निंबवृक्षाच्या खालीं पादुका स्थापन केल्या. शा० १८३४ सालीं श्रावण महिन्यांतला शुद्ध पर्वकाळ साधून दादा केळकरांच्या हस्तें मुहूर्तावर पादुकांची स्थापना करण्यांत येऊन उपासनींनीं शास्त्रोक्त विधि केले. पुढें

दिक्षित ब्राह्मण पादुकांची पूजा करीत असे आणि भक्त सगुणमामा पुढची सर्व व्यवस्था पहात असे. अशी ही पादुकांची कथा आहे.

असे हे संत निर्विकार असून प्रत्यक्ष ईश्वरी अवतारच आहेत आणि लोकांवर उपकार करून जगदुद्धार करण्यासाठीं ते पृथ्वीवर अवतरतात. पुढें कांहीं दिवस जातां एक आश्चर्यकारक गोष्ट घडून आली. ती ऐकतांच आपणांस नवल वाटेल. मोहिद्दिन भाई नांवाचा तांबोळी होता. त्याचा बाबांबरोबर मतभेद होऊन दोघांमध्यें तेढ उत्पन्न झाली आणि एके दिवशीं दोघांची कुस्ती लागली. दोघेही कुशल कुस्तीगीर; परंतु मोहिद्दिनचा जय होऊन बाबांना हार खावी लागली. त्या दिवसापासून बाबांनीं निश्चय केला. आपला पोषाख सर्वस्वीं बदलला. लंगोटी लावून अंगांत कफनी चढविली आणि डोक्यास फडकें गुंडाळिलें, बसावयास आसन गोणपटाचें आणि अंथरूण पण गोणाचेंच. फाटकेतुटके कपडे अंगांत घालून त्यांतच बाबांनीं समाधान मानावें. बादशाहाच्या श्रीमंतीपेक्षा गरिबी लाखपटीनें बरी. गरिबांचा वाली ईश्वर, असें साई नेहमीं सांगत. गंगागिरांचीहि अशीच स्थिति. त्यांनाही तालमीचा अतीशय शोक. अशीच एकदां कुस्ती खेळत असतांना त्याना उपरति झाली. योग्य काळ येतांच एका सिद्धाची वाणी वदली-'देवाबरोबरच क्रीडा करून ही तनू झिजविली पाहिजे' कुस्ती खेळतां खेळतां ही अनुग्रहरुपी वाणी ऐकतांच त्यांनीं संसारावर लाथ मारिली आणि ते परमार्थ भजनीं लागले. पुणतांब्याजवळ नदींत बेट आहे त्यावर गंगागीरबुवांचा मठ होता आणि पुष्कळ शिष्यहि त्यांच्या सेवेला होते.

[अपूर्ण]

## मनन करण्यासाठीं

प्रथम स्वतःची सुधारणा करण्यासाठीं शक्य त्या परीनें झटा म्हणजे इतरांची सुधारणा सहजासहजीं होईल. दुसऱ्यांचे दोष शोधीत बसण्यापेक्षां स्वतःमधील दोष शोधून ते काढून टाकण्यासाठीं झटावें.

तुम्हीं जें जें कांहीं कराल त्यांत आपलें अंतःकरणसर्वस्व ओता. हातीं घेतलेलें काम करतांना जरासुद्धां आळस किंवा हेळसांड करूं नका.

वेदान्ताचा प्रसार करण्याचा उत्तमोत्तम मार्ग म्हणजे स्वतःच्या आचरणांत वेदान्त आणण्यासाठीं मनापासून झटणें हाच होय.

दैवाची कसली मातब्बरी सांगतां ! जो दैवाशीं दोन हात करण्याच्या निर्धारानें बाहेर पडेल त्याच्यापुढें दैव वाकलेंच पाहिजे प्रेम ही अशी एक महान् शक्ति आहे कीं, त्याच्या बळावर कितीही कडवट शत्रू असला तरी तो तुमच्याकडे वळल्याशिवाय रहाणार नाहीं.

जो जगाशीं एकरूप झाला, हें विश्वचि माझें घर, अशी ज्याची भावना झाली, त्याच्या आटोक्यांत जग आल्याशिवाय कसें राहील ?

— स्वामी रामतीर्थ

# नीलवर्ण घनःश्याम

लेखक : **केशवराव कृ. प्रधान**, B. A. L. L. B.

**प्रकरण पहिलें** **जन्मापूर्वी**

**परित्राणाय साधूनाम् । विनाशाय च दुष्कृताम् ॥**
**धर्म संस्थापनार्थाय । संभवामि युगे युगे ॥**

प्रकृतिधर्माप्रमाणें उत्क्रांतीचें कार्य न घडतां जेव्हां तें अडखळतें – रेंगाळतें – तेव्हां उत्क्रांतीला नवचेतना देण्यास तिच्या नसानसांतून नवें चैतन्य खेळवण्यास – चैतन्य सम्राट् अशा प्रभूचा अवतार होतो.

वसंत ऋतूच्या आगमनापूर्वीच, पुरोफलानि, या न्यायानें सृष्टी गर्भधारणापूर्व स्त्रीसारखी यौवनोन्मादक चळवळ करूं लागते. निसर्गांतील वस्तुमात्र आगामी वसन्त चैतन्य आत्मसात करण्याच्या तयारीत दिसतें. अगदीं तद्वतच प्रकृतिबद्ध अणुरेणु, चैतन्य संचारपूर्व स्थितींत प्रभु आगमनाची वाट पहात निःस्तब्ध स्थितींत उभे आहेत असें भासूं लागलें.

**ज्यांचीं देहमनें तशींच वचनें पुण्यामृतें ओतिलीं ॥**
**ज्यांच्या केवळ स्पर्शनें द्रवलुनि पूनीत झाली मही ॥**

अशा येशू ख्रिस्त, भगवान् बुद्ध, प्रभु रामचंद्र अशा थोर अवतारांची जन्मसमयीं अगदीं वरीलप्रमाणें अणुरेणू आणि जीवमात्र ह्यांची स्थिति झाली होती; तर पूर्णअवतार जगन्नियंता अशा श्रीकृष्णाच्या आगमनसमयीं केवढी मोठी तयारी झाली असेल ?

## कंसाच्या बंदिशाळेभोंवतीं खळबळ

मथुरेच्या कंसाच्या बंदीशाळेभोंवतीं अशीच एक दिवस खळबळ सुरू झाली. आश्विन शुद्ध प्रतिपदा हा तो दिवस. बंदीशाळेभोवतालच्या भूमींतल्या अगदीं खोल थरापर्यंत एक दिवस अशीच जागृतीची लाट उसळली गेली व मातीच्या कणाकणामध्यें कांहीं कुजबुज सुरू झाली. घोर निद्रेंत असलेले मातीचे कण जागृत होऊन वेली वृक्षांच्या मुळाशीं आपल्या अस्पष्ट आवाजांत कुजबुजूं लागले. वेली फुलांच्या कानांत, तर वृक्ष फळांबरोबर, गप्पागोष्टी करण्याच्या स्थितीप्रत पोंहोंचले. पक्षी घरट्यांत, तर पशू गोठ्यांत वात्सल्य भावानें आपल्या छबुकड्यांना अधिकच जवळ ओढूं लागले. बंदी शाळेंतील पहारेकरी आपला क्रूर स्वभाव सोडून उगीचच आपआपसांत प्रेमविनोद, थट्टामस्करी

करूं लागले. कंसाच्या मनांत देवकीविषयीं उगीचच प्रेम निर्माण होऊं लागलें. मथुरे-पासून कांहीं अंतरावर जरा दूर असलेल्या गोकुळांतल्या बैलगाईंच्या अंगावर कोणीतरी —फार प्रेमानें हात फिरवल्यावर उठतात तसे रोमांच, तशी शिरशिरी उठल्यामुळें बैल आपल्या मोठाल्या सुंदर डोळ्यांनीं गायांकडे प्रेमानें पाहूं लागले, तर गाई—वासरांना वरपासून खालपर्यंत चाटूं लागल्या; वासरें झोपेंत कानांत कांहीं संगीताचे गोड गोड स्वर घुमल्यामुळें गुदगुदल्या झाल्याप्रमाणें तुटक तुटक स्वरांत हंबरूं लागली. गोकुळांतल्या गौळणींना उगीचच स्वतःच्या सुंदर बांधा आरशांत पाहून शरीरसौष्ठव करण्याची व स्वशृंगार करण्याची हौस निर्माण झाली. गोकुळांतल्या वेली टवटवीत झाल्या. व त्यावरील फुलें स्त्री शृंगारासाठीं उत्सुक होऊन आपआपसांत गोल फेर धरूं लागली. आजपासून तीन आठवड्यांनीं गोकुळांत श्रीकृष्ण जन्म होणार होता; व त्या चिमुकल्या श्रीकृष्णाचे गोंडस चरण लागून गोकुळांतल्या मातीचा कण न् कण पवित्र, मंगलमय होण्याची जणूं वाटच पहात होता. म्हणूनच किंबहुना त्या महान् भाग्यशाली भूमींतून मधुर दिव्य स्वर्गीय असा कुसुमगंध निर्माण झाला; व त्यामुळें सर्व कृमीकिटक सृष्टी अगदीं आनंदानें बावरून, गोंधळून गेली. वेलीवाटिका उगीचच तजेलदार दिसूं लागल्या; व वेळूवनांतून श्रीकृष्णाच्या मुरलीचीं नादस्वप्नें वायूच्या लहरी-मधून बोलकीं होऊं लागलीं.

## नन्द आणि यशोदा

नन्दाचे पुष्ट बाहु उगाचच स्फुरूं लागले व त्याला महान् पराक्रमी गोंडस बाळाला आपण वर उचलून आपल्या बाहूवर घेतलें आहे असें वाटूं लागलें. यशोदा माता आजुबाजूच्या खेळकर व खोडकर गोपबालांची लीला पाहून गालभर खदखदून हंसू लागली व उगाचच त्यांतील एखादा सुंदर गोपबालाला जवळ घेऊन वात्सल्यानें त्याचें मस्तकें अवघ्राण करूं लागली. तो पराक्रमी श्रीकृष्ण येथेंच गोकुळांत ल्हानाचा मोठा होणार होता. येथेंच ल्हान वयांत शूरांना लाजविणारीं पराक्रमी कृत्यें करणार होता. म्हणूनच कीं काय यशोदेच्या सुन्दर टपोऱ्या डोळ्यांत वीरश्री चमकूं लागली. यशोदेच्या सुंदर मुखकमलावर वात्सल्य, हास्य, वीरश्री वगैरे भाव अशी कांहीं संगनिर्मिति करूं लागले कीं गोकुळांत कोणीतरी राज घराण्यातील स्त्री सम्राज्ञी अवतरली आहे कीं काय अशी योजना दिसूं लागली. अजून कृष्णजन्माला पंधरा दिवसांचा अवकाश होता.

इकडे मथुरेंत बंदिखान्यांत हजारो वर्षें तप केल्यामुळें अतीव पुण्यसंचय होऊन दिव्यत्व पावलेल्या महर्षींसारखें उगाचच वासुदेवाला वाटूं लागलें. एकाएकीं आपल्या एका शुभ आशिर्वादानें एका दिव्य क्षणांत सर्व ब्रह्मांडाला सर्व महान् मंगलमय अशी सुबत्ता देऊन टाकण्यास आपण समर्थ झालों आहोंत असें त्यास वाटूं लागलें व तो उगाचच क्षणोक्षणीं स्तब्ध राहून डोळे कोठेंतरी दूर लावून — नजिकच्या भविष्याच्या पलीकडे पाहूं लागला. देवकी — जगन् माता — जगद् प्रभूंना आपल्या ठायीं अधिक वेळ ठेवण्यास असमर्थ होऊं लागली.

दुर्जनांनीं संतप्त केलेली धरा होरपळून धगधगलेल्या वणव्याप्रमाणें सर्व बाजूंनीं पेटल्यामुळें तिच्यावर सिंचन करण्यास उद्युक्त झालेला परममंगल अमृत सागर आपल्याच ठिकाणीं जास्त वेळ धारण करून ठेवणें तिला अशक्य वाटूं लागलें. तसेंच देवकीच्या भोंवतालचें वातावरण इतकें मंगल होऊं लागलं कीं, एखाद्या मोहक शुभ्र कमलाभोंवतीं हंस पक्षी — सारवाक भृंग, फुलपांखरें आपल्या निरनिराळ्या रंगसंगतीनीं एक प्रकारची मादक माया पसरतात तसे देवदूत, अप्सरा आपल्या भोंवती घिरट्या घालीत आहेत, असें तिला वाटूं लागलें. थेट भगवान महादेवापासून छोटे मोठे देव पृथ्वीतलावर अवतार घेण्यास उद्युक्त झाल्यामुळें भगवान परमश्रेष्ठ श्रीकृष्णाची आज्ञा घेण्यासाठीं तिच्या मागेपुढें फिरूं लागले; व विश्वाची दडवून ठेवलेली ही महान् संपत्ति मी विश्वाला केव्हां एकदां देऊन टाकतें असें तिला झालें.

## स्वर्गांत उडालेली धांदल

स्वर्गांत देव दुंदुभी करण्यासाठी आपआपलीं वाद्यें साफ करून सुरांत लावूं लागले. नन्दी, गरुड इत्यादि देवांचीं वाहनें आपलें अंग पंख उगीचच हलवून कांहीं-तरी दिव्य तयारी करूं लागलीं.

ज्याच्या आगमनाची केवळ चाहूल लागल्याबरोबर जड, अजड सृष्टि जी येवढी चळवळ करूं लागते—तें परब्रह्म कोणत्या स्थितींत असते तें आतां पाहूं. गौरीशंकर, कैलास, कांचनगंगा इत्यादि अति उंच अशा हिमालयाच्या बर्फाच्छादित शिखरावर जशी अवर्णनीय मंगलमय शांतता असते, तसेंच परब्रह्म—तत्व—जगनिर्मीति करून शांत निराकार निर्गुण निरामय—नीळ काल नामरूप उत्क्रांति या बंधनानीं आपल्याला बांधून न घेतां, जसें कांहींच झालें नाहीं असे स्वस्थ झोपीं गेलेलें दिसतें. व तेथे अशीच मंगलमय शांतता असते. आकाशांत स्वच्छ शुभ्र ढगांनी कापूस अगदी घनदाट पेरावा व त्यावेळीं आकाशाचें छत्र जसें बर्फाच्छादित शांत भासतें, अगदी तसेंच हालचाल न करतां पडून राहिलेले हे सर्व व्यापी सर्व शक्तीमान् परब्रह्म स्वरूप द्रष्ट्यांना दिसतें. अशा ठिकाणीं द्रव निर्माण करणें—घनीभूत बर्फाला पाझर फोडणें—हें नरराक्षसाच्या हृदयांत प्रेम करण्यापेक्षांहि कठीण काम असतें.

## निसर्गाची उत्क्रांत क्रिया

परंतु हें काम एकच शक्ति करते. ती म्हणजे निसर्गाची उत्क्रांति क्रिया थोपवणारी भूतलावरची पापशक्ति. हजारों निरपराध जीवांचे छळ—जेव्हां त्या जीवांना असह्य होतात व प्रकृतीचे बंध दिवसेंदिवस सैल न होतां जीवांना अधिकाधिक घट्ट बांधून त्यांना पशु, वेली, दगड या एकाहून एक खालील थराकडे जबरदस्ती करून ओढूं लागतात, जेव्हां भूमींतील अणुरेणु अधिकच खालीं जाऊं लागतात. तेव्हां पृथ्वीला हा भार सहन न होऊन ती कपिला गायीचें स्वरूप घेऊन—ब्रह्मदेवाला शरण जाते असें पुराणांत वर्णन आहे.

'हे भगवान्—मनुष्याचें कर्म म्हणजे काय हो;' असा एकदां श्रीभगवंताना प्रश्न केला असतां त्यांनीं उत्तर दिलें, 'हें बघ बाळ, तुम्हीं मानव पृथ्वीतलावर जीं शुभाशुभ कर्में करतां, त्यांनीं माझे अवयव तयार होतात. तुमच्या अशुभ कर्मांनीं माझ्या शरिरांत विष निर्माण होतें. तें विष मी परत तुमच्याकडेच जर न ढकलून दिलें तर मला माझे अवयवच कापावे लागतील. हें ढकलून दिलेलें विष हेंच मानवांचें कर्म होय.' पृथ्वीतलावर अशी नित्यशः शेकडो हजारो अशुभ कर्में घडूं लागलीं कीं सर्व शक्तिमान् दयाळु परमेश्वराची सुद्धां तें विष दूर करतां करतां त्रेधा उडते व आपली महान् योगनिद्रा भंग करून पृथ्वीतलावर अगदीं उगमापाशींच ह्या विषारी कर्मांच्या वेली खुडून टाकण्यास त्यास स्वतः अवतार घ्यावा लागतो.

## विधात्याचें पहिलें कार्य

विश्वनिर्मीति ही प्रचंड विविधतेची कलात्मक प्रतिकृती आहे. पृथ्वी, आप, तेज, वायु आणि आकाश या पंच महाभूतांतून ही विश्वनिर्मिति करतांना विधात्यानें आपलें सर्व कलाकौशल्य पणालाच लाविलें आहे कीं काय असें वाटतें. एक महान् निळी पोकळी निर्माण करून त्यामध्यें आपल्या चेतनाशक्तिरुप श्वासानें डोळे दिपवून टाकणारें तेज उत्पन्न करणें हें ह्या विधात्याचें अगदीं पहिलें कार्य आहे. 'God said let there be light and there was light' या बायबलमधला अगदीं सुरवातीच्या वाक्यापासून तो सर्व पृथ्वीच्या निर्मीतीनंतर 'God took rest' या शेवटापर्यंत ब्रह्मदेव आपल्या कलाकौशल्याची कशी अगदी कमाल करतो तें आपल्याला कळतें. प्रत्येक अणुरेणूला, वस्तुमात्राला, स्वतेजानें तळपूं देण्याकरितां व इतर अणुरेणु, वस्तुमात्रापेक्षा आपण कोणी वेगळे आहों असे वाटण्यास लावण्याकरितां, त्या अणुरेणू वस्तुमात्रांत आपली स्वतःची स्वतंत्र शक्ति निर्माण करावी लागते. या इच्छाशक्तीला आपलें स्वतंत्र अस्तित्व भासविण्यास अहंकाराचा अवलंब करावा लागतो, म्हणजे 'मी कोणीतरी आहे' व मी कोणीतरी इतरापासून वेगळा आहे 'अशी भावना नैसर्गिकरित्याच त्याच्या ठिकाणीं उत्पन्न होते. ही वेगळेपणाची अणुरेणु भरलेली भावना म्हणजेच परब्रह्म तत्त्वाचा 'एकोहं बहुस्याम' हा अगदी आदिसंकल्प कीं ज्या संकल्पापासून हें विश्व निर्माण झालें. आणि ह्याच जगांत दिसणाऱ्या विविधतेचा पाया यालाच One in many and Many in One किंवा Unity in Variety or Variety in Unity असें म्हणतात. या एकत्वाला विविधतेला संभाळून घ्यावं लागतं, तर विविधतेला एकत्वाकडे सर्व वेळ लक्ष ठेऊन चालावं लागतं. यांतील समता—एकतानता जरासुद्धां बिघडली कीं विधात्याची सर्वच कृति बिघडण्याचा संभव निर्माण होतो. ज्याप्रमाणें मधुर संगीत निर्माण करण्याकरितां वीणावादनपटूला "सारेगम" सारख्या कोमल, मध्यम व तीव्र सुरांचा अवलंब करावा लागतो, परन्तु तो करतांना त्यांतील ठराविक समता त्याला सोडतां येत नाहीं, त्याप्रमाणेंच विधात्याला

विविधता निर्माण करतांना मूळ संकल्प निर्मिणाऱ्या परब्रह्माचेंच पूर्ण ध्यान ठेवावें लागतें. विश्वनिर्मितीसाठीं वापरलेल्या तिन्ही म्हणजे सत्त्व, रज आणि तम या गुणांची साम्यावस्था राखावी लागते. ज्ञान, भक्ति आणि कर्म या तीन गुणांचा सुन्दर समन्वय राखावा लागतो. तीव्र, मध्यम आणि पायात्मक सुरांची जोपासना करून त्यामधून विश्वाचें मधुर संगीत निर्माण करावें लागतें. हें कार्य करण्यास ब्रह्मदेवसुद्धां असमर्थ होतो, त्याचवेळीं प्रभूला तें कार्य सावरून ब्रह्मदेवाकडे पुनश्च सोपविण्यासाठीं जन्म घ्यावा लागतो, त्यालाच अवतार म्हणतात.

## पाप आणि पुण्य

प्रभु सच्चिदानंद स्वरूप आहे. आपल्या पृथ्वी सारखीं अनंत कोटी ब्रह्मांडें केवळ त्याच्या प्रतिबिंब स्वरूपामध्यें सामावली आहेत. त्याच्या सत् चिद् आणि आनंद या स्वरूपातील अगदी पहीलें दृश्य प्रतिबिंब चिद् हें होय. विश्व निर्मीतीचें अगदी पहिलें कार्य म्हणजे चिद्—चैतन्य, जड स्वरूपामध्यें दृश्यमान करणें. चेतनाशक्ति जवळ जवळ दुसऱ्या टोकाला म्हणजे बाह्यतः मृतस्वरूपामध्यें दाखविणें. Sprit took the Part of seemingly dead matter असेंच त्याचें वर्णन करावे लागेल. हा अफाट जडपसारा केवळ मृतावस्थेंत आहे असें विश्वनिर्मिती झाल्याबरोबर कोणासही वाटावे असे तें दृश्य असतें. ही जडस्वरूपापर्यन्त होणारी परब्रह्माची प्रातिकृति फारच मनोहर असते. प्रथमतः भोवतालीं स्वसामर्थ्यानें पोकळी निर्माण करून त्या पोकळींत आपल्या महान् श्वसनानें वायूचे इतकें प्रचंड चलनवलन करावयाचें कीं त्या ठिकाणीं दैदीप्यमान तेजच तेज निर्माण व्हावें व त्या तेजवायू मिश्रणाचे सर्व ठिकाणीं अफाट जलांत रूपांतर व्हावें. तें अफाट जल हाच किंबहुना स्वस्वरूप प्रतिबिंबित करण्याचा परब्रह्माचा आरसा. तें स्वरूप जड वनस्पती, कीटक, पक्षी, पशु, मानव, देव, चैतन्य या हळुहळू होणाऱ्या उत्क्रांतिपथावरून फिरवणें, हाच त्यांतील परिक्रम. तो उत्पत्ति, स्थिति आणि लय यांत पर्यवसित करणें हेंच तें कार्य. ज्याप्रमाणें दृश्य निर्माण झालें त्याच परिक्रमानें तें लयास नेणें हीच ती क्रिया. ह्या क्रियेंत अडथळा निर्माण होणें हेंच पाप व यांस गति मिळणें हेंच पुण्य.

## प्रभू अवतार केव्हां घेतो ?

उत्क्रान्तिचें चक्र पुढें न जाता तें अवक्रान्तिकडे झुकूं लागलें कीं परमेश्वराला अवतार घ्यावा लागतो. जड जेव्हां पुढील योनित उत्क्रान्त न होतां एक एक योनिला मागें ढकलूं लागते तेव्हांच परमेश्वराचा अवतार होतो. जेव्हां सत्त्व, रज, तम या त्रिगुणांची साम्यावस्था बिघडून—सत्व रजावर भार देते व रज तमावर झुकते व तम आपल्या स्वरुपानें जग झाकाळून टाकून जिकडे तिकडे अन्याय, अंधःकार पसरते तेंव्हांच परमेश्वराला अवतार घ्यावा लागतो.

मानवापुरतें बोलायचें म्हणजे जेव्हां मानवांतली बुद्धी मनांत उलटी घुसून मनाला विकृत करूं लागते व मन शरीराच्या जड विलासामध्येंच दंग होतें,

# घ्या साईप्रभूंचें नाव

[ चाल — मी निरांजनांतील वात ]

घ्या साईप्रभूंचें नांव ।
शिरडीग्रामीं वास करूनि जो, पार करिल भव नांव ॥ ध्रु० ॥
निश्चित केलें त्यांस सद्गुरु । वाटे मजला किति सेवा करूं ।
परि निर्बल मी नाहिं बुद्धि ती । विनती मजला पाव ॥ १ ॥
धुवोनि जाइल पाप मलिन तें । लोळण घेतां पदीं लीन तें ।
आत्मोद्धारा आळस कां मग । बाबा पदिं द्या ठाव ॥ २ ॥
उत्सवांत त्या नामकीर्तनीं । चरिता अपुल्या सदा वाचनीं ।
दादा भाऊ मधु नानांसह । पथ सत्संगति दाव ॥ ३ ॥
नाम तुझें हें गोड ऐकतां । पूजन करितां निर्मल चित्ता ।
मातृ पितृऋण मनीं ठेवितां । करि मज रंक हि राव ॥ ४ ॥
भरताग्रज भरतातें देऊनि । सद्गुणि (जाया) नलिनी सुत त्या उदरीं ।
बैसविलें मज सुखसिंहासनी । मन घे चरणीं धांव ॥ ५ ॥

—बाबांच्या बाळाचें बाळ

---

तेंव्हा मानवाची वासनापूर्ती न होता, त्याच्या ठिकाणीं केवळ निराशा वैफल्य पसरतें व जडइंद्रीय सुखापासून त्याला शान्ति आणि सुख न मिळाल्यामुळें तो अनाचार करण्यास प्रवृत्त होऊन उत्तम उत्तम जीवन मुल्यें सोडून स्वतःचा अधःपात करण्यास अधिकाधिक प्रवृत्त होतो. व असा अधःपात झाल्यावरच त्याला बुद्धी योग्य व अयोग्य विचार कोणाचे यांचे परिक्षण करण्यास लावेत. व मग सर्व घडी नीट बसविण्याच्या मार्गाला तो लागतो. अशा सर्व तऱ्हेने मानवांचा ऱ्हास होऊन मग त्याला श्रेष्ठ मार्गाला लावण्यापेक्षां एका ठराविक कार्याला मानसिक, बौद्धिक, पातळीखालीं त्याला जाऊं न देण्या-करितां म्हणून प्रभूला अवतार घ्यावा लागतो. विश्व उत्क्रान्तीमध्यें अशा वेळा वारंवर येतात. कांहीं कमी महत्वाच्या, कांहीं साधारण महत्वाच्या व कांहीं अति महत्वाच्या असतात. जेव्हां त्या कमी महत्वाच्या असतात, तेव्हां उत्क्रांतींत मानव व देव कोटीच्या मध्यांवर असलेले श्रेष्ठ पुरुष जगद्कार्यासाठीं जन्म घेतात—जेव्हा त्या साधारण महत्वाच्या असतात तेव्हां देवकोटी लगत् उत्क्रांत पावलेले सत्पुरुष जन्म घेतात. आणि जेव्हां त्या अति महत्वाच्या असतात तेव्हा जशी जरूर असेल त्याप्रमाणें अंश रूपानें किंवा पूर्णा-शानें प्रभुला मानवी देहांत जन्म घ्यावा लागतो. ( अपूर्ण )




## मे १९६०

या महिन्यांतून सुट्टी असल्यानें बाहेर गांवचे भक्त लोक बऱ्याच मोठ्या संख्येनें श्रीचे दर्शनास आले होते. कांहीं कलाकारांनीं श्रीपुढें हजेरी दिली.

**कीर्तन :—** ह. भ. प. राघवेंद्र आचार्य टोणपे, पंढरपूर; सौ. कमलाबाई वाल्हेकर, मुंबई; श्री. ह. भ. प. किसनगुरु नांदेडकर; सं. गवई मराठे.

**सनई वादन :—** श्री. गंगाधर विश्वनाथ संत, बडोदा.

**फिडल वादन :—** श्री. नरेंद्र देवासकर, मुंबई.

**गायन—**श्री. लक्ष्मणराव देवासकर मुंबई, श्री. वामन गोविंद खोपकर, सौ. विमल गुप्ते मुंबई, श्री. जे. पी. मोहिले मुंबई, श्री. विनायक आचरेकर मुंबई, कु. नलिनी सरनोबत राजेंद्र नगर इंदौर, श्री. शांतीकुमार शेलार मुंबई, श्री. वासुदेव कृष्णाजी सामंत वांद्रा, श्री. काशिनाथराव फाटक, मुंबई, कु. मनमोहन वासुदेव सामंत कुमार नारायण वासुदेव सामंत वांद्रा, श्री. किसन धोंडू वाघ धुळें, श्री. श्रीनिवास पुरुषोत्तम शीरापूरकर ठाणें, श्री. गोपाळकृष्ण भागवत बंडकेडगांव, श्री. डी. एम्. नाडकर्णी, मुंबई, श्री. काशिनाथ शंकर बोडस कानपूर, स्वरमंडळ वाद्यांसह (गायन) श्री. शंकर श्रीपाद बोडस कानपूर सौ. सरोजीनी दप्तरदार मुंबई, सौ. विमल गव्हाणकर, मुंबई; श्री. दिवाजी वामन कुंभेकर, मनमाड; श्री. भाऊराव कासरेकर, इंदौर; श्री. गोपाळराव वास्तव (तबला)

**मोठ्यांच्या भेटी—** मे. सेशनजज साहेब नगर; मे. नामदार गाढे, जंगलमंत्री महाराष्ट्र राज्य; मे. नामदार पी. के. सावंत, शेतकी मंत्री महाराष्ट्र राज्य, मे. कलेक्टर साहेब, अहमदनगर.

**हवापाणी—**रोहिणी नक्षत्राचा पाऊस थोडा पडला. हवेंत गारवा येऊं लागला आहे.

---

## श्रीसाईनाथ वाचनालय, शिरडी

श्रीसाईनाथ कै. अण्णासाहेब दाभोळकर वाचनालयास शिरडी संस्थानचे ऑफिस सुपरि. श्री. गं. त्रिं. कार्णिक यांनीं महाराष्ट्र सरकार प्रकाशित श्री ज्ञानेश्वरीची अस्सल प्रत देणगीदाखल दिली आहे. व्यवस्थापक समिति त्यांच्या या देणगीबद्दल आभारी आहे.

—×—





तारेचा पत्ता : 'ABHAY' Hyderabad. टेलिफोन नं. ४६३८

# हैद्राबाद सॅनेटोरियम

**खास क्षयरोग्यांसाठीं !**

हवेशीर आधुनिक सुखसोयींनींयुक्त अत्यंत माफक दर असलेलें व साईभक्तांनीं चालविलेलें एकमेव ठिकाण.

पुण्याहून रेल्वेनें फक्त बारा तासांचा प्रवास.

**गरीब साईभक्तांसाठीं खास सवलत**

विशेष माहितीकरितां खालील पत्त्यावर लिहा:—

**सुपरिंटेंडेंट हैद्राबाद सॅनेटोरियम,**
**रमतापूर, हैद्राबाद १३. [ आंध्र प्रदेश ]**



